


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १९४ * नांदेड * सोमवार, दि. २१ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राष्ट्रवादीच्या युवक प्रदेशाध्यक्षाची कार्यकर्त्यांना मारहाण

## रमी खेळल्याप्रकरणी कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याचे निवेदन देऊन पत्ते उधळले; सुरज चव्हाण यांच्याकडून कोपर, बुक्क्यांनी मारहाण



**लातूर (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये लातूरमध्ये मोठा राडा झाला. विधानसभेत रमी खेळणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंचा राजीनामा मागणाऱ्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी कोपराने आणि बुक्क्यांनी मारहाण केली. सूरज चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाटगे यांना मारहाण केली. त्याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

सुनील तटकरे हे रविवारी लातूर येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर पत्रकार परिषदेला ते संबोधित करत होते. पत्रकार परिषद संपल्यानंतर अखिल भारतीय छावा संघटनेचे काही पदाधिकारी त्या ठिकाणी आले. सभागृहात गेम खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही, याबाबत त्यांनी निवेदन दिलं.

त्याचवेळी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सुनील तटकरेंच्या समोर पत्ते टाकले. यानंतर राष्ट्रवादी आणि छावा संघटनेचे कार्यकर्ते भिडले. यामध्ये राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाणांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्याला जोरदार मारहाण केली. सूरज चव्हाण यांनी हाताच्या कोपराने, बुक्क्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्याला मारहाण केल्याचं दिसून येतंय.

### भावना अनावर झाल्या म्हणून मारलं –सुरज चव्हाण

आपल्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्याविषयी अपशब्द वापरले. त्यानंतर आमच्या कार्यकर्त्यांच्या भावना अनावर झाल्यामुळे हे पाऊल उचललं असं सूरज चव्हाण म्हणाले. त्यांची मागणी संविधानिक पद्धतीने करायला हवी होती. ती मागणी करताना त्यांनी असंविधानिक शब्दांचा वापर केला. तटकरे यांनी त्यांची समजूत काढली. पण त्या कार्यकर्त्यांनी अपशब्द वापरला. बाहेर जाताना त्यांनी अपशब्द वापरल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्याला अशा पद्धतीने प्रतिसाद दिला. सत्तेत आहोत म्हणजे आम्ही सगळं काही चुकीचंच करतोय असं नाही, असं सूरज चव्हाण म्हणाले.

### याचा हिशोब होणार –विजयकुमार घाडगे

अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी करणारं निवेदन दिलं. दोन दिवसांपूर्वी ते ऑनलाईन पत्ते खेळताना आढळून आले, म्हणून असे कृषी मंत्री नका ठेवू असं सांगणारं निवेदनं दिलं. त्यानंतर बाहेर येऊन दुसऱ्या हॉलमध्ये बसलो. त्यानंतर राष्ट्रवादीचे लोक आले आणि त्यांनी आमच्यावर हल्ला केला. सत्तेचा माज काय असतो तो राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये पाहायला मिळाला. अजित पवार यांना सांगणं आहे, अजितदादा तुमच्या कार्यकर्त्यांनी छावाला डिवचलं आहे, छावा म्हणजे शेतकऱ्यांची पोरं आहेत. या गोष्टीचा हिशोब होणार, चुकीच्या पद्धतीनं लोकांना हात घातला आहे, असा इशारा छावाचे विजयकुमार घाडगे यांनी दिला आहे.

# हिमाचल प्रदेशमध्ये अतिवृष्टीमुळे ११६ जणांचा मृत्यू

## राज्यात आतापर्यंत १२३० कोटी रुपयांचे नुकसान



**शिमला (प्रतिनिधी)–** हिमाचल प्रदेशात यंदा मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. अतिवृष्टीमुळे गेल्या महिनाभरात झालेल्या विविध घटनांमुळे ११६ जण मृत्यूमुखी पडल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधीकरणाने दिली.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एसडीएमए) प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार २० जून ते १८ जुलै या कालावधीत पावसाशी संबंधित आपत्ती आणि अपघातांमध्ये ११६ मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. या एकूण मृतांपैकी ६८ जणांचा मृत्यू थेट पावसाशी संबंधित घटनांमध्ये झाला आहे. त्यामध्ये ३३ वेगवान पूर, २२ ढगफुटी, आणि १९ दरड कोसळणे यांचा समावेश आहे. फ्लॅश फ्लड्स आणि ढगफुटीमध्ये प्रत्येकी १४ जणांचा मृत्यू, बुडाल्यामुळे १२ जणांचे प्राण गेले, विजेचा धक्का बसून ५ जणांचा मृत्यू झाला, तर दरड कोसळल्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला. याशिवाय साप चावणे, तसेच इतर कारणांनी २२ मृत्यू झाले आहेत.

पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, घसरट चढ-उतार, दरड कोसळणे आणि कमी दृश्यता यामुळे राज्यात ४८ रस्ते अपघातांचे बळी गेले आहेत. सोलानमध्ये ८, कुल्लूमध्ये ७, चंबामध्ये ६ आणि शिमलामध्ये ४ जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे. हिमाचलमधील मंडी, कांगडा, कुल्लू आणि लाहौल-स्पीती हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मंडी आणि कांगडा येथे प्रत्येकी १६ जणांचा मृत्यू, तर कुल्लूमध्ये ७ जणांचे प्राण गेले आहेत.

मुसळधार पाऊस, भूस्खलन, महापूराच्या आपत्तीमुळे राज्यातील सार्वजनिक पायाभूत सुविधा, घरे, शेती, पशुधन आणि दळणवळण यंत्रणेचे मोठे नुकसान झाले आहे. एकूण आर्थिक नुकसान १२३० कोटी रुपये इतके असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. राज्यात सध्या एनडीआरएफ, एसडीआरएफ, होम गार्ड्स आणि स्थानिक प्रशासनामार्फत बचाव आणि पुनर्स्थापना कार्य सुरू आहे. प्रशासनाने नागरिकांना आणि पर्यटकांना अत्यावश्यक नसल्यास डोंगराळ भागात प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

# कार व ऑटो अपघातात दोन जण ठार; तीन जण गंभीर

## वाडी शिवारातील घटना




**नांदेड (प्रतिनिधी)–** मरळक येथून ऑटोमध्ये प्रवासी घेऊन नांदेडकडे निघालेल्या ऑटोला रिंग रोड बायपास रस्त्याने जाणाऱ्या एका चारचाकी वाहनाने वाडी शिवारात असलेल्या चौकात जोरात धडक दिली. या धडकेत दोघेजण ठार झाले असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली.

नांदेड तालुक्यातील मरळक येथील ऑटो क्रमांक (एम.एच. २६ बी.डी. ९६८३) मधून काही प्रवासी घेऊन ऑटो नांदेडकडे येत होता. यावेळी मरळक चौक नवीन बायपास रस्ता येथे ऑटो येताच क्रेटा गाडी क्रमांक (एम.एच. २६ डी.सी. ६७९०) च्या चालकाने भरधाव वेगाने चालून ऑटोला जबर धडक दिली. यावेळी ऑटो चालक गणपत मलिकार्जुन केवडे (वय ४० रा. मरळक) याच्या डोक्याला कमरेला जबर मार लागला. तसेच बापूराव चोकोबा पोहरे (वय ६५ राहणार मरळक) यांनाही जबर दुखापत झाली. अनिता बापूराव पोहरे (वय ६०), भाग्यश्री मनमत स्वामी (वय ३२), प्रयागबाई शिवलिंग स्वामी (वय ५५) आणि सम्राट बालाजी भिसे (वय ७) रा. सरेगाव यांना जबर दुखापत झाली. गंभीर जखमी झालेल्या प्रयागबाई शिवलिंग स्वामी आणि बापूराव चोकोबा पोहरे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यापैकी तिघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांना शिवाजीनगर भागात असलेल्या एका खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे व त्यांचे सहकारी घटनास्थळी धावले. तातडीने त्यांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी कार चालकाविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टीम इंडियाला धक्का : नीतीश कुमार रेड्डी मालिकेतून बाहेर

**मुंबई (प्रतिनिधी)–** इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत आधीच पिछाडीवर असलेल्या टीम इंडियाच्या अडचणी काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. मँचेस्टरमध्ये २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्याच्या अगोदर भारतीय संघावर दुखापतीचं ग्रहण लागले आहे. आधीच वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आणि आकाश दीप हे दोघं दुखापतीमुळे संघाबाहेर गेले आहेत, आणि आता अष्टपैलू खेळाडू नीतीश कुमार रेड्डी देखील या यादीत सामील झाला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रेड्डीला झालेल्या दुखापतीमुळे तो उर्वरित दोन्ही कसोटी सामने खेळू शकणार नाही.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना मँचेस्टरमध्ये २३ जुलैपासून सुरू होणार आहे. त्याआधी भारतीय संघ जोरदार **(पान ६ वर...)**

# मी जाहिराती स्कीप करत होतो –मंत्री माणिकराव कोकाटे

**मुंबई (प्रतिनिधी)–** मी वरिष्ठ सभागृहात बसलो होतो, त्यावेळी कनिष्ठ सभागृहात काय चाललय पाहण्यासाठी युट्यूब प्ले करत होतो. मात्र युट्युब प्ले करत असतानाच जाहिरात आली, ती जाहिरात स्कीप करताना दोन-तीन सेकंद लागले. तुम्हाला तशी जंगली रमी जाहिरात येत नाही का? असा उलट सवाल मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केला.

मंत्रीपद मिळाल्यापासूनच वादाची किनार लाभलेल्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा आणखी एक पराक्रम समोर आला आहे. थेट विधिमंडळामध्येच जंगली रमी गेम खेळतानाचा आमदार रोहित पवार यांनी व्हिडिओ ट्विट केल्यानंतर माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा वादात सापडले आहेत. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांना जंगली रमीच्या व्हायरल व्हिडिओवर उत्तर देताना चांगलाच दम लागल्याचे दिसून आले.

कोकाटे यांनी आपला बचाव करताना मी काही पाप केलं नसल्याचे म्हणाले ते म्हणाले. मी जाहिराती स्किप करत होतो त्यामध्ये दोन-तीन सेकंद लागले ते त्यांना दाखवायचं नाही, आम्ही शेतकऱ्यांसाठी केलेला कामावरती ते बोलत नाहीत. माझं काम पारदर्शकपणे असल्याने मी कशाला अशा पद्धतीने गेम खेळत बसू असं सावरासारव माणिकराव कोकाटे यांनी केली.

# पंतप्रधान मोदी करणार इंग्लंड आणि मालदीवचा दौरा



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी इंग्लंड आणि मालदीवचा दौरा करणार आहेत. पंतप्रधान कीर स्टारमर यांच्याकडून आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करत पंतप्रधान मोदी २३ आणि २४ जुलै असा दोन दिवसांचा इंग्लंडचा दौरा करणार आहेत. हा पंतप्रधान मोदींचा सरकारी दौरा आहे. पंतप्रधान झाल्यापासूनचा मोदींचा हा चौथा इंग्लंड दौरा आहे. इंग्लंड दौऱ्यानंतर पंतप्रधान मोदी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्याकडून आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करत २५ आणि २६ जुलै असा दोन दिवसांचा मालदीव दौरा करणार आहेत. पंतप्रधान झाल्यापासूनचा मोदींचा हा तिसरा मालदीव दौरा आहे.

परदेश दौऱ्यात पंतप्रधान मोदी द्विपक्षीय संबंधांबाबत इंग्लंडच्या नेत्यांशी चर्चा करतील. प्रादेशिक आणि जागतिक सहकार्याबाबत चर्चा होईल. व्यापार, अर्थव्यवस्था, संशोधन, औद्योगिक सहकार्य, संरक्षण, सुरक्षा, पर्यटन, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण आदी विषयांतील सहकार्याबाबतही चर्चा होईल.




**नांदेड :** अखिल भारतीय छावा विद्यार्थी आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा शेतकरी नेते विजयकुमार घाडगे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे प्रदेशाध्यक्ष आणि इतरांकडून झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ अखिल भारतीय छावा संघटना व सकल मराठा समाज नांदेडच्यावतीने रेल्वे स्टेशन रोडवर टायर जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. (छाया : करणसिंह बैस)

# राज्यातील ३१ जिल्ह्यांना आज येलो अलर्टचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात आज दि. २१ जुलै रोजी पावसाचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागाच्या अंदाजावरून लक्षात येत आहे. त्यानुसार कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस होण्याचा इशारा देण्यात आला आहे. ३१ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये विजा आणि वादळी वाऱ्यांसह पाऊस होण्याची शक्यता असून पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, पुणे घाटमाथा, कोल्हापूर, कोल्हापूर घाटमाथा, सातारा, सातारा घाटमाथा, सांगली, सोलापूर या सर्व जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

# प्रवासी बोटीला भीषण आग, पाच जणांचा मृत्यू

**जकार्ता (वृत्तसंस्था)–** इंडोनेशियाच्या उत्तर सुलावेसी येथून एका भीषण अपघाताची बातमी समोर येत आहे. स्थानिक वेळेनुसार दुपारी १.३० वाजता, समुद्राच्या मध्यभागी एका प्रवासी जहाजाला अचानक आग लागली. या अपघातात किमान पाच जणांचा मृत्यू झाला आहे. आग लागलेल्या जहाजाचे नाव केएम बार्सिलोना व्हीए फेरी असे असून, हे जहाज इंडोनेशियातील उत्तर सुलावेसी प्रांतातील बेट जिल्हा तलौद येथून प्रांताची राजधानी मनाडो येथे जात होते.







# किनवट येथील रानभाज्या महोत्सवास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**किनवट (प्रतिनिधी)–** आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय किनवटतर्फे आदिवासी लाभार्थ्यांसाठी रविवारी शहरातील हु. गोंडराजे शंकरशहा रघुनाथशहा मैदानातील पालिकेच्या आठवडी बाजारात पावसाळी रानभाज्यांचे प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रानभाजी महोत्सवात करटुले, रणधोपा भाजी, कावळामुळ, रान रताळी, तोंडली, रान राजगिरा, बांबू कंद मूळ भाजी, रान शेवभाजी इत्यादी रानभाजींचा समावेश होता. सदर महोत्सवात किनवट व परिसरातील नागरिकांनी रानभाजी खरेदीसाठी गर्दी केली होती. आदिवासी विकास विभागाचे आयुक्त लीना बनसोड व अमरावती विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी, किनवटचे सहायक जिल्हाकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांच्या मार्गदशनाखाली सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प कार्यालयाचे सहायक प्रकल्प अधिकारी पी.एस. नाईक, कार्यालयीन अधीक्षक आर. ए. भंगारे, आदिवासी विकास निरीक्षक आनंद मेथे, संतोष राठोड, विकास विभागाचे जी.एस. कटकमवार, टी.डी. घोसले, नितीन मस्के, बालाजी इंदुरकर, गजानन वानोळे , मनोज टिळे, विस्तार अधिकारी किरण बोर्डे जोशी व माधव मुंडे यांनी प्रयत्न केले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# सीबीएसई : ही तर कतृघ्नता

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर अखिल भारतीय इतिहासाचे तेजस्वी शिल्पकार आहेत. त्यांनी निर्माण केलेले 'हिंदवी स्वराज्य' हे केवळ सत्तेचे नव्हे, तर मूल्यनिष्ठेचे आणि लोकाभिमुखतेचे प्रतीक आहे. अशा एका महानायकाचा इतिहास जर केवळ ६८ शब्दांत सामावण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर तो केवळ अज्ञानाचा नव्हे, तर संस्कृतीच्या अपमानाचाही गंभीर प्रकार ठरतो. शालेय अभ्यासक्रम हे कोणत्याही देशाच्या भावी पिढीला घडवणारे प्रभावशाली माध्यम असते. इतिहासाचे शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक अस्मिता, राष्ट्रभक्ती आणि वैचारिक सुसंवादाचे बीज पेरते. या पार्श्वभूमीवर पाहता, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केवळ एका धड्यात आणि त्यातही केवळ ६८ शब्दांत झाला आहे, ही बाब अत्यंत लाजिरवाणी आणि चिंताजनक आहे. यावरून या बोर्डाच्या पाठ्यपुस्तक लेखकांच्या आणि समस्त मंडळाच्या अज्ञानपणाचा प्रत्यय येतो. मर्यादित लेखन म्हणजे इतिहासाचा अपमान नव्हे का? कारण महाराजांचे कार्य म्हणजे केवळ युद्धातल्या शौर्यगाथा नाहीत. त्यांनी प्रशासकीय व्यवस्था, गनिमीकाव्याचे धोरण, लोकसहभाग, स्त्रियांचा सन्मान, धर्मनिरपेक्षतेचा अवलंब, पर्यावरणपूरक किल्ले आणि सागरी संरक्षणासारख्या अनेक मूलभूत बाबींवर आधारित राज्यकारभार उभा केला. त्यांचा इतिहास म्हणजे एक व्यापक संदर्भग्रंथ आणि जीवनग्रंथ आहे. तो जर केवळ ६८ शब्दांत मांडण्यात येतो, तर ते अज्ञानाचे लक्षण आहे की हेतुपुरस्सर दुर्लक्ष, याचे उत्तर केंद्र सरकारला द्यावेच लागेल. याचे पडसाद सध्या उमटत आहेत. हा भावनिक रोष आणि त्यावरील होत असलेले राजकीय भाष्य कोण थोपवू शकणार? शिवसेनेच्या आमदार भावना गवळी यांनी विधीमंडळात सरकारला ज्या प्रकारे खडसावले, त्यामागे केवळ राजकीय संताप नाही, तर सामान्य जनतेच्या भावनांचे प्रतिनिधित्व आहे. 'शिवशाही'चा जयघोष करणाऱ्या सरकारने प्रत्यक्षात शिक्षणाच्या माध्यमातून महाराजांचे कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी काय केले? हाच खरा प्रश्न आहे. यावरून सीबीएससीचा संपूर्ण पॅटर्नच दोषी असल्याचे सिद्ध होते. अशा प्रकारचा नाकर्तेपणा यापूर्वीही या मंडळांनी अनेक वेळा केला आहे, परंतु कोणत्याही नेत्याने आवाज उठविला नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव. सीबीएससीच्या अभ्यासक्रमाचा ढाचा अनेक वर्षांपासून उत्तर भारतकेंद्री असून, त्यात विविध राज्यांतील आणि विशेषतः मराठा इतिहासाचा बेमालूमपणे उपेक्षा करण्यात आलेली आहे. मुघल शासकांवर विस्तृत धडे आणि त्यामध्ये त्यांचा क्रूरपणा लपवून त्यांचे नसलेले गुण दाखविण्यात येतात, पण मराठ्यांचा केवळ छायाचित्रवत उल्लेख केला जातो, हे चित्र अनेक वर्षांपासून आहे. अशा अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या समजुतीवर एकतर्फी परिणाम होतो. त्यामुळे देशातील एकात्मतेला धक्का पोहोचतो, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. यावर आता शिष्टमंडळ, चर्चा आणि आश्वासनांचा खेळ सुरू होणार आहे. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी 'दिल्लीत ठाण मांडू' अशी ग्वाही दिली असली, तरी जनतेला आता केवळ शब्दांपेक्षा कृतीची प्रतीक्षा आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याशी शिष्टमंडळाने भेट घेऊन प्रस्ताव मांडण्याची घोषणा झाली असली, तरी या मागणीत फार उशीर झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ महाराष्ट्रापुरता नाही, तर संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. तो प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याच्या मनात रुजवण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणधोरणात त्यांना योग्य आणि व्यापक स्थान मिळाले पाहिजे. कारण शिक्षण हे केवळ शिक्षण नसते तर तो एक संस्कार असतो आणि जसे संस्कार केले जातात अशा प्रकारचे विद्यार्थी घडत जातात. म्हणूनच आज माथा फिरलेले तरुण दिसतात ते याचमुळे. कारण कोणत्याही समाजाची मूल्यव्यवस्था ही शिक्षणातून घडते. जर आज आपण आपल्या मुलांना त्यांच्या इतिहासातील आदर्श नेतृत्व, धर्मनिरपेक्षतेचा आदर्श, प्रशासनाचा ताळमेळ याची ओळख करून देणार नसू, तर उद्याची पिढी आदर्श कुणाला मानेन? शिवाजी महाराज हे आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांचे प्रतीक आहेत. त्यांना कमी लेखणे म्हणजे नव्या भारताला इतिहासविहीन करणे. म्हणूनच देशद्रोही लोकांचा कट्टरपणा खपवून घेतला जाऊ नये. त्यांनी इतिहास नाकारण्याऐवजी स्वीकारले पाहिजे. महाराजांचा जाज्वल्य इतिहास लपून ठेवल्यामुळे त्यांचे काही बिघडणार नाही परंतु देशाचे मात्र अतोनात नुकसान होणार आहे हे सीबीएससीच्या अज्ञानी लोकांनी ओळखले पाहिजे. सीबीएससीसारख्या राष्ट्रीय संस्थांनी एकसंघ, समावेशक आणि तटस्थ अभ्यासक्रम तयार केला पाहिजे. इतिहासात कोणतीही 'निवड' असता कामा नये. शिवरायांचा इतिहास हा भारताच्या अस्मितेचा कणा आहे. तो ६८ नव्हे, तर ६८०० शब्दांतही मावणारा नाही. त्यामुळे या पातळीवर तातडीने बदल करणे हे केवळ शैक्षणिक गरज नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्य आहे. याबाबत जर आपले लोकप्रतिनिधी आवाज उठविणार नसतील तर त्यांची ती जनतेच्याप्रति कृतघ्नता ठरेल.

# जागरूकतेचा अभाव आणि कर्करोगाचा प्रसार



कॅन्सर, टीबी आणि हार्ट अटॅक यासारख्या आजारांची आकडेवारी कोरोनाच्या काळात समोर येऊ शकली नव्हती. मात्र आता आलेली कर्करोगाची ताजी आकडेवारी देशाची भयावह स्थिती दर्शवते. पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यसभेत अधिकृत आकडेवारी सादर करताना, केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी स्वत: सांगितले की २०२० ते २०२२ या काळात देशात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आइसीएमआर) च्या राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रमानुसार, २०२० मध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १३,९२,१७९ होती आणि २०२१ मध्ये ती १४,२६,४४७ आणि २०२२ मध्ये १४,६१,४२७ वाढली. २०२० मध्ये भारतातील कर्करोगाने मृत्यूचे अंदाजे प्रमाण ७,७०,२३० होते आणि ते २०२१ मध्ये ७,८९,२०२ आणि २०२२ मध्ये ८,०८,५५८ पर्यंत वाढले आहे.

एका प्रश्नाच्या उत्तरात आरोग्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, राज्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या आधारे, आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कर्करोग, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, स्ट्रोक प्रतिबंध आणि नियंत्रण (एनपीसीडीसीएस) या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत , राज्ये आणि केंद्र केंद्रशासित प्रदेशांना तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरवली जाते. कर्करोग हा एनपीसीडीसीएस चा अविभाज्य भाग आहे आणि या कार्यक्रमाचा उद्देश पायाभूत सुविधा मजबूत करणे, मानव संसाधन विकास, आरोग्य संवर्धन आणि कर्करोग प्रतिबंध, त्याचे लवकर निदान, व्यवस्थापन आणि कर्करोगासह असंसर्गजन्य रोग (एनसीडी) चे उत्तम आरोग्यसेवा उपचार यासाठी जागरूकता निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

एनपीसीडीसीएस अंतर्गत, ७०७ जिल्हा एनसीडी केंद्रे, २६८ जिल्हा काळजी केंद्रे आणि ५,५४१ सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आणि सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवेचा एक भाग म्हणून सामान्य असंसर्गजन्य रोग, म्हणजे मधुमेह, उच्च रक्तदाब आणि सामान्य कर्करोग यांच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि तपासणीसाठी लोकसंख्या-आधारित उपक्रम देखील सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत, तीस वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना तोंड, स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या तीन सामान्य कर्करोगाच्या तपासणीसाठी लक्ष्य केले जाते. २०२२ मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १४६१४२७ होती, ज्यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त होत्या. महिलांची संख्या ७४९२५१ तर पुरुषांची संख्या ७१२१७६ होती. महिला आणि पुरुषांमध्ये सर्वाधिक कर्करोग पचनसंस्थेच्या अवयवांमध्ये (२,८८,०५४), स्तन (२,२१,७५७), प्रजनन प्रणाली (२,१८,३१९), तोंड (१,९८,४३८) आणि श्वसन प्रणाली (१,४३,०६२) मध्ये होतात.

महिला आणि पुरुषांमध्ये वयाच्या ७४ व्या वर्षांपर्यंत कर्करोग होण्याचा धोका नऊपैकी एक असा आहे. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका ६७ पैकी एक आणि महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका २९ पैकी एक असे प्रमाण आहे. इंडियन मेडिकल कौन्सिल ऑफ रिसर्चच्या डिसेंबर २०२२ च्या आकडेवारीनुसार, देशात स्तनाच्या कर्करोगाची सुमारे १,८२,००० प्रकरणे आढळून आली आहेत. २०३० पर्यंत ही प्रकरणे अडीच लाखांपर्यंत वाढू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, २०१८ मध्ये कर्करोगामुळे एकूण ९६ लाख मृत्यू झाले. यापैकी सत्तर टक्के मृत्यू गरीब देशांमध्ये किंवा भारतासारख्या मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये झाले आहेत. याच अहवालानुसार, भारतात कर्करोगामुळे ७.८४ लाख मृत्यू झाले आहेत. म्हणजेच कर्करोगामुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी आठ टक्के मृत्यू हे एकट्या भारतात झाले आहेत.

पंजाब, हरियाणा, हिमाचल आणि चंदीगडमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. पंजाबमध्ये २०१८ मध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या ३६८०१, २०१९ मध्ये ३७७४४ आणि २०२० मध्ये ३८६३६ झाली. हरियाणात २०१८ मध्ये २७६६५, २०१९ मध्ये २८४५३ आणि २०२० मध्ये २९२१९ कॅन्सरची प्रकरणे आढळून आली. हिमाचलमध्ये २०१८, मध्ये ८०१२, २०१९ मध्ये ८५८९ आणि २०२० मध्ये ८७७७ प्रकरणे आढळून आली. चंदीगडमध्ये २०१८ मध्ये ९६६, २०१९ मध्ये ९९४, २०२० मध्ये १०२४ प्रकरणे आढळून आली. सध्या पंजाबमध्ये एक लाख लोकांमागे ९० रुग्ण कर्करोगाने ग्रस्त आहेत. गेल्या सात वर्षांत दरवर्षी सरासरी ७५८६ नवीन प्रकरणे समोर आली आहेत. सरकार कर्करोगग्रस्तांच्या उपचारावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचा दावा करत असले तरी जनजागृतीअभावी त्याची कहाणी उलटी आहे.

आजदेखील अनेक स्त्रिया लाज आणि भीतीमुळे आजार सांगायला तयार नाहीत. कर्करोगावर उपचार घेत असलेले अनेक रुग्ण कर्करोग हा पिढ्यानपिढ्याचा आजार आहे, असे मानतात, तर वैद्यकीय शास्त्रानुसार केवळ पाच टक्के कर्करोग पालकांकडून मुलांकडे जातो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पंजाबमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढण्यामागे कीटकनाशकांचा अतिवापर हे एक कारण असल्याचे सांगण्यात आले आहे. नैऋत्य पंजाबमधील कापूस पिकवणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कॅन्सरचे प्रमाण असामान्यपणे जास्त आहे, जे इतर घटकांसह कीटकनाशकांच्या वापराशी संबंधित आहे. जगभरातील देशांमध्ये कर्करोगाविरुद्धचे युद्ध सुरू आहे. पण जितक्या वेगाने उपाय शोधले जात आहेत तितक्याच वेगाने त्याचा प्रसारदेखील होत आहे. मात्र, या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी देशी पद्धतींद्वारे उपचाराच्या शक्यता शोधण्याचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. आहारात बदल करून त्यांच्यावर उपचार करण्याचेही काही प्रयत्न चालले आहेत.

असाच एक प्रयोग जादवपूर विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागात करण्यात आला, ज्यामध्ये दैनंदिन आहारात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांपासून बनवलेल्या सर्वपिष्टी या औषधाची चाचणी करण्यात आली. औषधाच्या परिणामकारकतेची पातळी तपासण्यासाठी साधारणपणे दोन प्रकारच्या चाचण्या केल्या जातात- पहिली म्हणजे औषधीय (फार्माकोलॉजिकल) चाचणी आणि दुसरी विष विद्यासंबंधी (टोक्सीकोलाजिकल) चाचणी. आयात केलेल्या पांढऱ्या उंदरांवर या चाचण्या करण्यात आल्या. प्राण्यांच्या शरीरात कर्करोगाच्या पेशी प्रविष्ट करण्यात आल्या आणि जेव्हा ट्यूमर तयार झाला तेव्हा औषध द्यायला सुरुवात केली गेली. 'पोषण ऊर्जा' चाचणी स्थितीत, चौदा दिवसांनंतर आढळलेला प्रतिसाद पाहिला असता, या पेशींची संख्या लक्षणीयरीत्या कमी होऊ लागली होती. प्राण्यांच्या शरीरात अल्सर निर्माण झाले नाहीत.

ट्यूमरच्या वाढीचा दर सहाचाळीस टक्क्यांनी कमी झाला आणि औषधाची विषारीता जवळजवळ शून्य होती. असे सकारात्मक परिणाम अलीकडच्या काळात दिसून आले नव्हते. या औषधामध्ये कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी आणि त्याच्याशी लढण्यासाठी अपार अशी शक्यता आहेत. चाचण्या घेणाऱ्या डॉ. चॅटर्जी यांच्या निष्कर्षांवरून हे औषध कर्करोगाच्या रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच कर्करोगाच्या रुग्णांच्या उपचारातही त्याचा उपयोग प्रभावी ठरला आहे. परंतु औषधांना मान्यता देणाऱ्या संस्थांनी अजून त्याला मान्यता न दिल्याने ते अद्याप बाजारात उपलब्ध झाले नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की तुमच्या कर्करोगाच्या उपचारात काही दिवसांचा विलंबदेखील घातक ठरू शकतो. दुसरी सकारात्मक गोष्ट म्हणजे थायरॉईड, गर्भाशय आणि स्तनाचा कर्करोग यांसारख्या काही प्रकारच्या कर्करोगाच्या जवळपास इलाज शंभर टक्के पोहचला आहे. टेस्टिक्युलर आणि थायरॉईड सारख्या कर्करोगात, आपण सहजपणे म्हणू शकतो की बरे होण्याची शंभर टक्के शक्यता आहे, परंतु स्वादुपिंड (पेनक्रिएटिक) सारख्या कर्करोगाच्या इतर प्रकारांच्या बाबतीत, जगण्याची शक्यता कमी आहे. खरं तर कोणते संशोधन आपल्याला बरा होण्याच्या जवळ जाईल हे सांगता येणे कठीण आहे. आम्ही खात्रीने एवढेच म्हणू शकतो की औषधे, केमो आणि रेडिएशनद्वारे उपचार चांगले होत आहेत.

**–मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे.

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत.

अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला



जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते.

ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरूण घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला.

नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात.

निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे.

निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**–श्याम ठाणेदार,**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# अति सर्वत्र वर्जयेत...

'अति तिथं माती' ही म्हण जगातल्या प्रत्येक माणसाला माहीत आहे. कोणतीही बाब योग्य प्रमाणातच असली पाहिजे. अगदी अत्यंत चांगल्या गोष्टीने सुद्धा प्रमाण ओलांडले तर ती गोष्ट चांगली राहत नाही. आणि एखादी वाईट वाटणारी गोष्ट सुद्धा प्रमाणात असेल तर ती वाईट ठरत नाही. म्हणूनच जगात अशा अनेक बाबी आहेत ज्यांना विष मानले आहे तरीसुद्धा त्या जीवनात प्रमाणामध्ये असाव्या लागतात. उदाहरणच द्यायचे झाले तर नित्याच्या जेवणामध्ये असणाऱ्या मिठाला आणि साखरेला संशोधना नुसार विषच मानावे लागेल. पण तरीसुद्धा यांचे जेवणात आणि जीवनात किती महत्त्वाचे स्थान आहे हे आपण सर्वजण जाणतोच. मिठाशिवाय जेवणाला चवच नाही. या उलट अनेक वस्तू अमृतासारख्या आहेत. तरीसुद्धा त्या प्रमाणाबाहेर सेवन केल्या तर त्या विषच ठरतात. ही गोष्ट केवळ खाण्याच्या बाबी संदर्भातच नाही. तर ती जीवनातील प्रत्येक बाबीला लागू पडते. म्हणून आम्ही नेहमी ऐकत आलोय 'प्रमाणामध्ये सर्व काही असावे...' या वरील एक सुंदर कविता मला आठवते.

अति कोपता कार्य जाते लयाला
अति नम्रता पात्र होते भयाला
अति काम ते कोणतेही नसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
अति भूषणे मार्ग तो संकटाचा
अति थाट तो वेश होतो नटाचा
राहावे असे की न कोणी हसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
स्तुतीला अति बोलती ती श्वानवृत्ती
अति लोक निंदा करी दुष्ट चित्ती
न कोणा उगे शब्द स्पर्शे डसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...
जुन्या चे अति भक्त ते हटवादी
नव्याचे अति लाडके ते शुद्ध नादी
खरे सार शोधुनिया नित्य घ्यावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे...

ही कविता वाचल्यावर स्पष्टपणे समजते की कुठलीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाल्यास ती वाईट असते. मुळात ज्या गोष्टी वाईट आहेत त्या अजिबातच नसाव्यात. पण चांगल्या गोष्टींचा सुद्धा अतिरेक होऊ नये. उदाहरणच द्यायचे झाले तर...इतरांना मदत करणे, वेळोवेळी सहकार्य करणे ही चांगली बाब आहे. पण ती सुद्धा योग्य मर्यादेत असली पाहिजे. स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी सक्षम नसणाऱ्या माणसांनी सतत परोपकाराच्या नावाखाली...आणि माणुसकीच्या लेबलाखाली सतत काही व्यक्तींना मोठ्या प्रमाणात आणि आवाक्याबाहेर केलेली मदत कायम स्वरूपी प्रश्नच निर्माण करते. सतत स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यापेक्षा...स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यापेक्षा...तुम्ही जर काही विशिष्ट माणसांना आवाक्याबाहेरची मदत करत असाल तर हे व्यावहारिक जग तुम्ही कोणीही असाल तरीसुद्धा तुम्हाला नक्की प्रश्न विचारेल. असे का...? आणि असे करण्यामागचा नेमका हेतू काय...? हे सर्वांनाच ज्ञात आहे. तरीसुद्धा माणसे आयुष्यभर प्रमाण सांभाळत नाहीत. अक्षरशः वाहवत जातात. परोपकार आणि चांगुलपणा याचा अतिरेक करतात...

तार्किक विचार केला तर तुम्ही जर एखाद्या व्यक्तीशी अति प्रमाणात चांगले..... अतीव सहकार्याचे... वागत असाल तर बघणाऱ्यांना याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्ष ज्या व्यक्तीशी चांगले वागत आहात अगदी त्यालासुद्धा नक्कीच प्रश्न पडतो. असे का...? मुळात तुम्ही कितीही चांगले असलात. तरी तुमचा चांगले-वाईटपणा हा तुमच्या मनाच्या निरागसते वरून ठरत नाही तो ठरतो तुमच्या वागण्यावरून. म्हणून किमान स्वतःसाठी नाही तर जगासाठी तरी प्रमाण सोडायचे नसते. कधीकधी चांगल्या गोष्टी सुद्धा प्रमाणापेक्षा जास्त झाल्या तर त्याचेही व्यसन लागते आणि त्याची सुद्धा नशा यायला लागते. बरीच माणसे परोपकार आणि चांगुलपणाच्या नशेत जगतात... संपूर्ण आयुष्य या नशेमध्ये वाहवत जातात... हे सगळे करताना आपल्या अत्यंत जवळच्या माणसांना दुखावतात... कळत-नकळत त्यांच्यापासून दूर जायला लागतात. एक दिवस बऱ्याच मोठ्या वाईट अनुभवानंतर चांगुलपणाची नशा उतरते. आणि त्यावेळी मात्र काहीच शिल्लक उरलेले नसते.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या गरजा पुर्ण झाल्यानंतर जमेल तेवढी गरजूंना मदत ही सर्वसामान्य पद्धत आहे. मुळात आपले आणि आपल्या कुटुंबाचे हित साधन्यापूर्वीच इतरांना आवाक्याबाहेर असणारी मदत करणे सुद्धा एका दृष्टीने आपल्या कुटुंबावर झालेला अन्याय असतो.

याच्याही पुढचा विचार म्हणजे प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला जमेल तेवढे कष्ट...जमेल तेवढे कार्य... आणि जमेल तेवढेच कर्तुत्व करण्याचा प्रयत्न करावा. काम करण्याचा... कष्ट करण्याचा.... आणि पैसा कमावण्याचा सुद्धा अतिरेक होता कामा नये. अर्थार्जनाचे सुद्धा व्यसन लागता कामा नये.

आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन घडवताना अती धावपळ करणे सुद्धा व्यर्थ आहे. मुळात क्षणभंगुर असणाऱ्या जीवनासाठी अफाट धावपळ करून बिनभरवश्याची गुंतवणूक कशासाठी....? मुळात जीवन तुम्हाला गुंतवणूक मागत नाही. या जीवनाला खऱ्या अर्थाने सोडवणुकीचे गरज असते. गोष्टी समजून साध्या, सोप्या, सरळ करता आल्या पाहिजेत. अत्यंत साधेपणाने आणि मोकळ्या वातावरणात जगता आले पाहिजे. शेवटी रिकाम्या हाताने आलेला माणूस रिकाम्या हातानेच परत जातो. मग आयुष्यभराची ही सगळी ओढाताण कशासाठी....? याचा अर्थ असा नाही की माणसाने कष्ट करू नयेत.... काम करू नये.... प्रयत्न करू नयेत...... याउलट माणसाने सतत क्रियाशील रहावे. यात शंकाच नाही पण कुठलीही धावपळ आणि कष्ट आपल्या जिवापेक्षा आणि जीवनापेक्षा महत्त्वाचे नाहीत. कोणतेच काम आपल्या जिवापेक्षा मोठे नाही. तुम्ही कितीही उदात्त, समाजहिताचे आणि विश्वकल्याणाचे काम करत असलात तरीसुद्धा ते काम करण्यासाठी तुमचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. म्हणून प्रमाणपेक्षा जास्त धावपळ केल्याने आजारी पडाल आणि करत असलेले ध्येयवेडे उदात्त कार्य थांबेल. म्हणून कार्य चालू राहण्यासाठी तरी प्रमाणात धावपळ करा. त्यामुळे थोडक्यात काय तर अति सर्वत्र वर्जयेत म्हणतात ते या अर्थाने....

**–मयूर मधुकरराव जोशी**
'विठ्ठल-रुक्मिणी' नगर,
जिंतूर
मो. ७९७२३४४१२८
९७६७७३३५६०

## थोडक्यात...

### 'आप' नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढविणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा आम आदमी पार्टी व शहर कार्यकारिणीच्यावतीने आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ह्या स्वबळावर लढविण्याची भुमिका घेतली आहे.

लोकसभा, विधानसभा निवडणुकामध्ये इंडिया आघाडीचा आपला आलेल्या अनुभवामुळे घेतली असून हा निर्णय आम आदमी पार्टीचे नेते तथा राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या आदेशावरून महाराष्ट्र राज्याचे प्रभारी माजी आ.प्रकाश जरवाल, महाराष्ट्र राज्य आम आदमी पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके, संघटन मंत्री संग्राम घाटगे, सचिव वैजनाथ राठोड यांनी घेतला आहे, अशी माहिती नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. जगजीवन भेदे, नरेंद्रसिंघ ग्रंथी, शहराध्यक्ष प्रा.देविदास शिंदे, जिल्हा सचिव डॉ. अवधूत पवार, संग्राम गिते, बालाजी नागेश्वर यांची दिली.

### आज समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जुलै महिन्यात आज सोमवार, दि. २१ जुलै २०२५ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. या लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# विशेष मध्यस्थी मोहितेअंतर्गत प्रकरणे निकाली काढावीत –न्या. प्रियंका चिद्रे



**लोहा (प्रतिनिधी)–** विशेष मध्यस्थी मोहमेअंतर्गत जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे प्रतिपादन लोहा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश प्रियंका चिद्रे यांनी केले.

न्यायालयात नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या कायदे विषयक मार्गदर्शन शिबीर प्रसंगी न्या. चिद्रे बोलत होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात एकाच वेळी 'शासाठी मध्यस्थी'' हे ९० दिवसांचे विशेष अभियान चालविण्यात येत आहे. यात अधिकाधिक पक्षकारांनी या म ोहिमेत सहभागी होऊन प्रलंबित तडजोडपात्र प्रकरणे न्यायिक मध्यस्थ आणि वकील मध्यस्त यांच्यासमोर मध्यस्थ प्रकियेसाठी ठेवली जाणार आहेत. ज्या पक्षकारांची इच्छा आहे, त्यांनी तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. शनिवार, दि. १३ सप्टेंबर, २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय लोक न्यायालयात आपले प्रकरण आपसात तडजोडीने निकाली काढून राष्ट्रीय अभियान यशस्वी करण्याचे आवाहन न्या. चिद्रे यांनी केले.

याप्रसंगी सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी निरंजन चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. या मोहिमे अंतर्गत कौटुंबिक हिंसाचारातील पीडितेस मोफत कायदे विषयक सल्ला व खटला चालविण्यास मोफत विधीज्ञ देण्यात येणार आहे.

यावेळी अभियोक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. सतिश ताटे, उस्म ाननगर येथील सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. एस. एस. पाटील, सहायक अधिक्षक विनोद सुरकूटवार, विधीज्ञ, पंचायत समिती, नगरपालिका व बँक व न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कुपटी येथे हातभट्टी दारूचा अड्डा उध्वस्त



**माहूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ नक्षलग्रस्त असलेल्या मौजे कुपटी येथे नाल्याशेजारी चालत असलेल्या हातभट्टी अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. यावेळी ४० हजार रूपयांचे रसायन व साहित्य उध्वस्त करण्यात आली. सदर घटना दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता घडली. या घटनेने हातभट्टी चालकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन 'फ्लश आऊट'अंतर्गत माहूर तालुक्यातील हातभट्टी दारू विक्री करणारे आणि देशी दारूची चोरट्या मार्गाने अवैधरित्या विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी कारवाया सुरू केल्या आहेत. अशीच कारवाई दि. १९ जुलै रोजी कुपटी येथे झाली. या कारवाईत आरोपी रामभाऊ देवराव अंभोरे (वय ४५, रा. कुपटी) यास मासरेडअंतर्गत जाय मोक्यावर पकडून येथे हातभट्टी दारू बनविण्याचे ६०० लिटर मोह फुल, इतर घातक केमिकल टाकलेले रसायन १०० लिटर, हातभट्टीची तयार झालेली दारू, दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्यासोबत सपोनि संदीप अन्येबोईनवाड, पोहेका गजानन चौधरी, ज्ञानेश्वर खंदाडे, पवन राऊत, चालक सिद्धांत नागरगोजे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.


तालुक्यात अनेक ठिकाणी मुजोरी करणाऱ्या दारू विक्रेत्यांकडून हातभट्टी दारू निर्माण करून विक्री करण्याचे प्रमाण सुरू वाढले आहे. अनेक ठिकाणी महिला समोर येत असल्याने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी स्वतः कारवायांची मोहिम हाती घेतली आहे.

या कारवाईनंतर पोलीस निरीक्षक कराड यांनी तालुक्यात अवैध धंदे करणाऱ्यांना इशारा देत तालुक्यात चालत असलेले हातभट्टीचे अड्डे उध्वस्त होत असून अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या एकालाही सोडणार नाही, असा इशारा दिला आहे.

# जैन वृद्धाश्रम येथे मोफत दंतचिकित्सा व उपचार शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. बसवंतराव मुंडकर विचारमंच, नांदेड आणि रुरल डेंटल कॉलेज अँड रिसर्च सेंटर, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जैन वृद्धाश्रम, जैन मंदिर परिसर, तरोडा खुर्द, नांदेड येथे आज सोमवार, दि. २१ जुलै रोजी सकाळी ९:४५ वाजता मोफत दंतचिकित्सा व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या शुभहस्ते होणार आहे. तर या शिबिराचे अध्यक्षस्थानी जैन वृद्धाश्रमाचे अध्यक्ष हे राहणार आहेत. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, प्राचार्य, डेंटल कॉलेज



अँड रिसर्च सेंटर नांदेड डॉ. भद्रा राव, विभागप्रमुख, दंतचिकित्सा विभाग डॉ. राजेश दार्सी, संचालक से. स. सोसायटी बिलोली भागरथबाई मुंडकर, संध्या छाया वृद्धाश्रम सुरेखा पाटणी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

स्व. बसवंतराव मुंडकर विचारमंच, नांदेड आणि रुरल डेंटल कॉलेज अँड रिसर्च सेंटर, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि. २१ जुलै रोजी जैन मंदिर परिसर, तरोडा खुर्द येथे सकाळी ९.४५ वाजता या शिबिराला सुरूवात होणार आहे. यावेळी मोफत दंत तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांकडून दंत उपचार व सल्ला, दंत आरोग्य विषयक मार्गदर्शन होणार आहे.

या शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे सर्व बसवंतराव मुंडेकर विचार मंचाचे डॉ. शिवदास हमंद आणि ॲड. धोंडिबाराव पवार यांनी आवाहन केले आहे.

# गवळी समाजातील १०० विद्यार्थ्यांचा होणार गौरव

## जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे प्रमुख मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सम ाजाच्या बौद्धिक समृद्धीचा उत्सव साजरा करताना नव्या पिढीच्या प्रज्ञेचा गौरव हा सगळ्यांच्याच मनाला आनंद देणारा क्षण असतो. प्रज्ञा जागृती मिशनच्यावतीने सोमवार, २८ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता, मारवाडी धर्मशाळा, साथी बालाराम यादव नगर, वजिराबाद, नांदेड येथे गवळी समाजातील सुमारे १०० प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

या समारंभात नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. सामाजिक शिस्त, सकारात्मक बदल आणि प्रभावी प्रशासन यांचा समतोल राखत त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या प्रगतीस मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ समाजातील युवकांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरणार आहे. तसेच या कार्यक्रमात आणखी दिक्षा अकॅडमीचे संस्थापक लक्ष्मीशंकर यादव हेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना नीट, जेईई यासारख्या आव्हानात्मक परीक्षांमध्ये येणाऱ्या शंकांबद्दल ते यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

या समारंभात शिक्षण, क्रीडा, कला, संस्कृती व इतर क्षेत्रांमध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. हा गौरव समाजाच्या सामूहिक उन्नतीचा प्रतीक ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रज्ञा जागृती मिशनचे कार्यकर्ते मेहनत घेत आहेत. यामध्ये गोकुल यादव, डॉ. संतोष मंडले, बिरबल यादव, सुशांत यादव, ॲड. ऋषी यादव, अमोल चौधरी, गौरव यादव, योगेश रौत्रे, दिनेश रौत्रे, महेश यादव, गोविंद मंडले, राजेश गवळी, ईश्वर यादव, दर्शन फतेलष्करी, मयूर परीवाले, सुनील लुले, भावेश यादव यांचा विशेष सहभाग आहे.

तसेच यादव महासभेचे माजी नगरसेवक बिशनकुम ार यादव, नरसिंग मंडले, राधाकिशन यादव, न्यायाधीश गजानन भानुदास यादव, तुलजेश यादव, किशोर यादव, धीरज यादव, गणेशलाल भातावाले, गोपाल फत्तेलष्करी, भारत यादव, सुंदरलाल भातावाले, विनय यादव, स्वराज यादव यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

या सन्मान सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवा आणि त्यांच्या यशाचा भाग व्हा. आणि या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन प्रज्ञा जागृती मिशनचे सचिव गगन लालामन यादव व कार्यक्रम संचालक डॉ. (प्रा.) कैलाश भानुदास यादव यांनी केले आहे.



**लोहा (प्रतिनिधी)–** स्व.वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलसचिव संतोष वेणीकर व विद्यापीठाचे सहायक कुलसचिव पद्माकर पाटील यांचा लोहा येथे त्यांच्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उपकार्यकारी अभियंता राजेंद्र टोके, मर्चंट बँकेचे संचालक हरिहर धुतमल, शीलानंद हटकर, वामन गोधने, स्वीय सहायक रेणुकादास साखरे, सहायक लेखाधिकारी सय्यद खालीस्क, सहायक कक्ष अधिकारी ज्ञानेश्वर गमे यांची उपस्थिती होती.

# पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे २२ जुलै रोजी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगारची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व यशवंत महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजक तसेच इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांनी २२ जुलै रोजी सकाळी १० वाजेपासून यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ.रा.म. कोल्हे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी nandedrojgar01gmail.com आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार यांचा क्रमांक ९८६०७२५४४८ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

# शिवाजी विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी संचलित शिवाजी विद्यालय सिडको नांदेड शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

या परीक्षेत विद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांनी यश मिळवले. तसेच पाचवी व आठवीतील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र ठरले आहेत. यामध्ये पाचवीतील रुद्र अमोल पेन्शनवार, जोशी स्पृहा प्रसाद, तुपकरी लक्ष गजानन, शिरसे लक्ष्मण सुमेध व मळगे वरद अशोक हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तर इयत्ता आठवीतील लिंगसेकर मंदार मयूर, नरवाडे मिथिलेश, बागे गणेश राजू, पांडे प्रज्वल, दिलीप व जाकोरे प्रशांत प्रकाश या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शाळेच्या वतीने शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्याध्यापक रवी शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.साहेबराव देवरे, पर्यवेक्षक विकास पाटील, मुख्य लिपीक वसंत वाघमारे, गणेश जाधव, एम.जी. स्वामी, आर.के.चंदनशिवे, पालक आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते.

# प्रशासकीय नातेसंबंधातून सामाजिक कार्याला गती देवू –प्रशांत राठोड



**किनवट (प्रतिनिधी)–** तळागाळातील सामान्यांना न्याय मिळण्यासाठी सेवा संकल्प प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण गेल्या ३५ वर्षांपासून सामाजिक कार्य करीत आहोत. प्रशासकीय नातेसंबंधातून भविष्यात या सामाजिक कार्याला गती देवू, अशी ग्वाही मंत्रालयात सेवारत कक्ष अधिकारी प्रशांत राठोड यांनी दिली.

किनवट तालुक्यातील पालाईगुडा येथील भूमिपुत्र प्रशांत राठोड यांचा सत्कार सेवा संकल्प प्रतिष्ठानच्यावतीने शहरातील एन.के.गार्डन येथे आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.

सन १९९० पासून सेवा संकल्पच्या माध्यमातून आपण निराधार, निराश्रीतांना आधार देण्याचे कार्य करीत आहोत. अनाथ मुला-मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलून त्यांचे विवाह लावून दिले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे तसेच नैसर्गिक आपत्तीने मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांनाही प्रतिष्ठानच्यावतीने मदत केली. कोरोना महामारीच्याकाळात तळागाळातील नागरिकांना आम्ही मदत केली. आणखी तीन वर्षे आपली शासकीय सेवा शिल्लक आहे. मंत्रालयातील नोकरीमुळे राज्यातील सर्वच लोकप्रतिनिधींचा माझ्याशी जवळून संबंध आला. याच नातेसंबंधातून सेवानिवृत्तीनंतर आपण सामाजिक कार्याला गती देवू. या कार्यासाठी किनवट, माहूर तालुक्यातील नागरिकांनी बळ, दिशा, उर्जा आणि आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन प्रशांत राठोड यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष साजीद खान यांच्यासह प्रवीण राठोड, गिरीश नेम्मानीवार, रोहिदास जाधव, राहुल नाईक, किशन राठोड, गजानन बोलचेट्टीवार, ॲड. नैतिक नाईक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, महिला व विविध पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. अरविंद राठोड यांनी आभार मानले.

# नांदेड महानगरपालिकेने डॉ. अण्णाभाऊ साठे यांची शासकीय जयंती साजरी करण्याची निवेदनाद्वारे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती नांदेड महानगरपालिकेने शासकीय जयंती म्हणून साजरी करावी, अशा आशयाचे निवेदन सार्वजनिक जयंती मंडळ यांच्यावतीने महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना देण्यात आले.

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी महाराष्ट्र, देश आणि विदेशातील दलित, शोषित, पीडिताचे आवाज आपल्या लेखणीतून पोवाड्यातून शाहिरीतून सतत मांडत राहिले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अण्णाभाऊनीं मोलाचा वाटा उचलला आहे. आयुष्याच्या पन्नास वर्षाच्या कालखंडत अण्णाभाऊनीं आपल्या लेखनातून आणि शाहीरी माध्यमातून समाज प्रबोधन आणि शोषितांच्या न्याय हक्कासाठी लढत राहिले. साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक -७० दि. २० ऑगस्ट २००९ प्रमाणे नांदेड महानगरपालिका द्वारा ठराव पारित कराण्यात यावा आणि साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या शासकीय जयंतीकरिता किमान ५ लाख रुपयांची तरतूद करून ठराव मंजूर करून नांदेड महापालिकेने भव्य-दिव्य शासकीय जयंती साजरी करावी, अशा आशयाचे निवेदन आयुक्त नांदेड महानगरपालिका यांचेकडे सार्वजनिक जिल्हा जयंती मंडळ नांदेड आणि समाजातील नेते मंडळी यांच्यावतीने देण्यात आले. याची अंमलबजावणी न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी जयंती मंडळाचे स्वागताध्यक्ष ॲड. सुरेंद्र घोडजकर, जिल्हा जयंती मंडळाचे अध्यक्ष नागेश तादलापूरकर, प्रा. देविदास इंगळे, पाध्यक्ष मारोती चिवळीकर, अंबादास भंडारे, सचिव ईश्वर जाधव, दिगंबर घायाळे, निलेश तादलापूरकर, भगवान जाधव, सुनिलकुमार मोघेकर, मारोती कांबळे, चंद्रमुनी कांबळे, कपिल कांबळे, किशन इंगळे, रोहन वाघमारे, सुनील डोईजड, गुणाजी बुजवणे, सोनू वाघमारे, रामा वाघमारे, आकाश गवाले, प्रकाश बोडारकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोजगार मिळण्यासाठी गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना सुरू करण्याची मागणी

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** बिलोली बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा यासाठी शंकरनगर येथील गोदावरी मनार साखर कारखाना तत्काळ चालू करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथील गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेला आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वाढत चाललेल्या बेरोजगारीचे चित्र बदलण्यासाठी तालुक्यातील बंद पडलेला कारखाना चालू करून बेरोजगारांना तसेच शेतकऱ्यांना उघोग व्यवसायाला चालना देण्याणी आवश्यकता आहे. परिसरातील एकही एमआयडीसी व उद्योगधंदे नसल्याने तालुक्यात बेरोजगारी वाढली आहे. त्याचबरोबर तालुक्यात खासगी छोटे-मोठे उद्योग नसल्याने विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. रोजगार निर्मितीसाठी गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना महत्त्वाची भूमिका बजावू शकते. उद्योग, व्यवसायाची अशी अवस्था असल्याने तालुक्यात रोजगार निर्मितीला खीळ बसली आहे. बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल असा शासकीय, सहकारी किंवा खासगी तरी मोठा उद्योग उभा करण्यात आला नाही. त्याच हेतूने राज्य सरकारने स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळांतर्गत येथे लघू औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात यावे, अशी मागणी तिरूपती डाकोरे यांनी यांच्याकडे मागणी केली आहे.

# प्रगतीमंत्र

## मेडिकल म्हणजे फक्त डॉक्टर बनणेच नाही तर 'या' करिअरलाही खूप मागणी

# लॅब टेक्निशियनला आहेत मोठ्या संधी!

**जर तुम्हाला वैद्यकीय क्षेत्रात करिअर करायचे असेल आणि जर तुम्ही उत्तम पर्याय शोधत असाल, तर १२ वी नंतर तुम्ही लॅब टेक्निशियन बनू शकता. यामध्ये ६ महिन्यांपासून सुरू होणारे अनेक अभ्यासक्रम आहेत. या करिअर पर्यायाबद्दल जाणून घेऊया...**



जर तुम्हाला वैद्यकीय क्षेत्रात करिअर करायचे असेल, तर डॉक्टर बनण्याव्यतिरिक्त इतर पर्याय आहेत. यापैकी एक म्हणजे लॅब टेक्निशियनचे काम. त्यांच्याशिवाय रुग्णाचे काम चालत नाही आणि डॉक्टरचेही काम चालत नाही. म्हणून, करिअरच्या प्रगतीसाठी हे चांगले असू शकते. वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली काम करतात, परंतु त्यांना वैद्यकीय शास्त्र तसेच प्रयोगशाळेतील सुरक्षिततेचे नियम आणि आवश्यकतांचे पूर्ण ज्ञान असते.

### लॅब तंत्रज्ञांचे काम

लॅब तंत्रज्ञ नमुन्यांची तपासणी करतात. तपासणी दरम्यान, काही नमुने पुढील तपासणीसाठी किंवा गरजेनुसार सुरक्षित ठेवले जातात. लॅब टेक्निशियन, ज्यांना एमएलटी म्हणूनही ओळखले जाते, त्यांचे काम खूप जबाबदारीचे आणि आव्हानात्मक असते. त्यासाठी खूप संयम आणि कौशल्य आवश्यक असते. ते गोळा केलेल्या डेटाची सुरक्षा आणि गोपनीयता राखण्यासाठी देखील जबाबदार असतात. इतकेच नाही तर ते निकालांचे विश्लेषण देखील करतात.

### अभ्यासक्रम...

लॅब टेक्निशियनशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, रुग्णालये, प्रयोगशाळा इत्यादींमध्ये मोठ्या संधी मिळतात. या क्षेत्रातील मागणी सतत वाढत आहे. या अंतर्गत अनेक प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. जसे की मेडिकल लॅब टेक्नॉलॉजीमध्ये प्रमाणपत्र (सीएमएलटी). हा ६ महिन्यांचा अभ्यासक्रम आहे, ज्यासाठी दहावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. यामध्ये डिप्लोमासाठी बारावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (पीसीबी) किंवा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) या विषयांसह बारावी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एमएलटीमध्ये बी.एस्सी. करण्यासाठी विज्ञान शाखेसह बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### महत्त्वाच्या संस्था

- पॅथॉलॉजी विभाग, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, अलीगढ, अधिकृत वेबसाइटः www.amu.ac.in/
- दिल्ली पॅरामेडिकल अँड मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली, अधिकृत वेबसाइटः www.dpmiindia.com/
- शिवालिक इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी, चंदीगड, अधिकृत वेबसाइटः www.shivalikinstitute.org/
- पॅरामेडिकल कॉलेज, दुर्गापूर, पश्चिम बंगाल, अधिकृत वेबसाइटः www.paramedicalcollege.org/
- टीप : येथे नमूद केलेल्या संस्थांची नावे केवळ तुम्हाला माहिती देण्यासाठी आहेत. याशिवाय, देशभरात इतर अनेक चांगल्या संस्था आहेत.



# एका वर्षात योगा मास्टर बना!

## BHU देत आहे प्रशिक्षण, प्रवेश कसा मिळवायचा जाणून घ्या

**जर तुम्हाला योगामध्ये रस असेल आणि तुमच्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करून तुमचे आणि इतरांचे जीवन सुधारायचे असेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. बनारस हिंदू विद्यापीठाकडून एक वर्षाचा योग अभ्यासक्रम सुरू केला जात आहे.**

बीएचयूचे योग साधना केंद्र, मालवीय भवन सप्टेंबर २०२५ पासून योग शिकवणी प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करत आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त, अधिकारी, कर्मचारी आणि बाह्य उमेदवार देखील या अभ्यासक्रमासाठी अर्ज करू शकतात. एक वर्षाच्या योग अभ्यासक्रमाबाबत बीएचयूने अधिकृत वेबसाइटवर नोटीस जारी केली आहे. त्यानुसार, अभ्यासक्रमाचे वर्ग ऑफलाइन मोडमध्ये आयोजित केले जातील. या अभ्यासक्रमात आसन, प्राणायाम, ध्यान, योग तत्वज्ञान, योग थेरपी, योग वर्तन, शुद्धीकरण क्रियाकलाप आणि मानसिक आरोग्याशी संबंधित सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल. सर्व उमेदवारांचे संपूर्ण प्रशिक्षण हिंदी भाषेत असेल आणि वर्ग मालवीय भवनातील योग साधना केंद्रात घेतले जातील.

- किती जागांवर प्रवेश? : बीएचयूच्या या योग अभ्यासक्रमासाठी २०० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर दिला जाईल, ज्यामध्ये आधीच मिळालेल्या पात्रता आणि योग प्रशिक्षणाचे मूल्यांकन देखील केले जाईल. विशेषतः स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांना मुलाखत आणि प्रवेश परीक्षेची माहिती नंतर दिली जाईल.
- कधीपासून ते कधीपर्यंत फॉर्म भरता येईल? : २१ जुलै २०२५ ते ५ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज करता येतील. अर्ज ५० रुपयांमध्ये कार्यालयातून मिळू शकतात आणि ते भरल्यानंतर, ते सर्व आवश्यक प्रमाणपत्रांसह कार्यालयात सादर करावे लागतील.
- वर्ग कधी सुरू होतील? : बनारस हिंदू विद्यापीठाच्या मालवीय भवनातील योग साधना केंद्राद्वारे चालवला जाणारा एक वर्षाचा योग अध्यापन प्रशिक्षण अभ्यासक्रम २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठी आहे. हा अभ्यासक्रम सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल आणि विद्यार्थ्यांव्यतिरिक्त सामान्य नागरिक देखील त्यात अर्ज करू शकतात.
- आवश्यक पात्रता : या अभ्यासक्रमासाठी किमान पात्रता १२ वी उत्तीर्ण आहे. तसेच, कोणत्याही आरोग्य प्रमाणपत्र धारकाला प्राधान्य दिले जाईल. हे प्रशिक्षण सत्र सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ पर्यंत चालेल. या अभ्यासक्रमाशी संबंधित तपशील जाणून घेण्यासाठी आणि अधिकृत सूचना पाहण्यासाठी येथे क्लिक करा. इच्छुक उमेदवारांना अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी, योग साधना केंद्र, बीएचयू येथे संपर्क साधता येईल.










# दिल्ली, मुंबई की बेंगळुरू...

## शिक्षणासाठी कोणते शहर सर्वोत्तम

**महागाई वेगाने वाढत आहे. याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला आहे. जगभरात शिक्षण महाग होत आहे. शिक्षणाचा खर्च हा केवळ पालकांसाठीच नाही तर मुलांसाठीही एक मोठा चिंतेचा विषय आहे. भारतातील मेट्रो शहरे चांगली महाविद्यालये आणि नोकरीच्या संधींसाठी ओळखली जातात. या शहरांमध्ये चांगले करिअर घडवण्यासाठी जितक्या जास्त संधी आहेत, तितकीच ती राहणीमानाच्या, खर्चाच्या बाबतीत महाग आहेत. दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूपैकी विद्यार्थ्यांसाठी कोणते शहर सर्वात स्वस्त आहे... या शहरांमध्ये किती नोकरीच्या संधी आहेत आणि येथे किती चांगले जीवन आहे, हे जाणून घेऊया...**

अभ्यासासाठी सर्वोत्तम शहर तुमच्या गरजेवर आणि निवडीवर अवलंबून आहे. पण अभ्यासासाठी किंवा नोकरीसाठी कोणते शहर निवडायचे? हे ठरवण्यासाठी हा लेख तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. क्यूएस अहवालात म्हटले आहे की दिल्ली या तीन शहरांमध्ये सर्वात स्वस्त आहे. इतकेच नाही तर जगातील सर्वात परवडणाऱ्या शहरांपैकी एक आहे. मुंबई विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आहे. तर, बंगळुरूमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे जीवन खूप चांगले आहे. क्यूएस बेस्ट स्टुडंट सिटीज २०२६ नुसार, दिल्लीचा स्कोअर ९६.५ आहे. म्हणजेच, ते केवळ भारतातीलच नाही तर जगातील विद्यार्थ्यांसाठी सर्वात स्वस्त शहरांपैकी एक आहे.

### दिल्ली इतकी स्वस्त का आहे?

अहवालानुसार, दिल्लीमध्ये राहण्याचा खर्च इतर मोठ्या शहरांपेक्षा कमी आहे. येथे तुम्हाला शेअरिंगमध्ये राहण्यासाठी खोल्या मिळतात. मेट्रो शहर असल्याने, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे स्वस्त आणि सोपे आहे. तुम्ही कमी पैशात चांगले जेवण खाऊ शकता. या सर्व कारणांमुळे, विद्यार्थ्यांचा दैनंदिन खर्च कमी होतो. दिल्लीमध्ये डीयू, जेएनयू आणि जामिया, बीआर आंबेडकर विद्यापीठ (एयूडी) इत्यादी चांगली सरकारी विद्यापीठे आहेत, जिथे फी खूप कमी आहे. मात्र सुरक्षितता आणि जीवनमानाच्या बाबतीत दिल्ली विद्यार्थ्यांच्या मनावर राज्य करू शकली नाही. दिल्लीतील प्रचंड प्रदूषणामुळे विद्यार्थ्यांना ती भावत नाही.

### मुंबईः QS रँकिंग ९८

भारताची आर्थिक राजधानी मुंबई QS २०२६ च्या यादीत ९८ व्या स्थानावर आहे. स्वप्नांचे शहर म्हणून ओळखले जाणारे हे भारतातील सर्वोत्तम शहर मानले जाते. त्याचा परवडणारा स्कोअर ८६.३ आहे, परंतु विद्यार्थ्यांच्या राहणीमानाच्या बाबतीत ते चांगले असल्याचे वर्णन केले गेले आहे. सेंट झेवियर्स, NMIMS आणि IIT बॉम्बे सारख्या देशातील टॉप कॉलेजांमुळे, देशभरातील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येतात. मुंबईत लोकल ट्रेनने येथे प्रवास करणे सोपे आहे. मुंबईमध्ये मोठ्या संख्येने वित्त, मीडिया आणि तंत्रज्ञान कंपन्या आहेत. यामुळे, येथे नोकरीच्या प्रचंड संधी आहेत. बाहेरून येथे शिक्षण घेण्यासाठी येणारे बहुतेक तरुण नोकरी मिळाल्यानंतर येथे स्थायिक होणे पसंत करतात. परदेशातून येथे कमी विद्यार्थी येतात.

### बंगळुरू : क्यूएस रँकिंग १०८

बंगळुरू हे भारताचे तंत्रज्ञान आणि स्टार्टअप कॅपिटल म्हणून प्रसिद्ध आहे. बंगळुरूचा परवडणारा स्कोअर ८४.३ आहे. हे शहर विद्यार्थ्यांना आनंदी ठेवण्याच्या बाबतीत खूप पुढे आहे. बंगळुरूला मिळालेले हे रेटिंग तीन शहरांमध्ये सर्वाधिक आहे. बंगळुरूमध्ये आयआयएससी, क्राइस्ट युनिव्हर्सिटी आणि पीईएस सारखी महाविद्यालये आहेत.

अहवालानुसार, येथील स्वस्त कॅफे, को-लिव्हिंग स्पेसेस आणि को-वर्किंग हब विद्यार्थी आणि तरुणांना आकर्षित करतात. यासोबतच, इन्फोसिस, विप्रो आणि अनेक मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांमुळे नोकरी मिळण्याची शक्यता खूप जास्त आहे. पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना येथे राहणे आवडते. येथील हवामान देखील चांगले आहे.



### कोणते शहर निवडावे आणि का?

जर तुम्ही या तीन शहरांचा विचार करत असाल आणि कमी खर्चात दर्जेदार शिक्षण मिळवायचे असेल, तर दिल्ली तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय असू शकते. विशेषतः जेव्हा तुम्ही देशातील सर्वोच्च सरकारी विद्यापीठात शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहता तेव्हा या शहराचे मूल्य वाढते. दुसरीकडे, जर तुम्हाला आल्हाददायक वातावरण आणि अधिक नोकरीच्या संधी हव्या असतील, तर बंगळुरू चांगले आहे. मुंबई थोडी महाग आहे, परंतु येथे चांगल्या नोकरीच्या संधी आहेत आणि येथील वातावरण देखील सुरक्षित आहे.

# पैसे खर्च न करता शिका रॉकेट सायन्स

## आयआयटीने एरोस्पेस इंजिनिअरिंगचे १० मोफत कोर्सेस

**जर तुम्ही अवकाश विज्ञान, रॉकेट बनवण्याचे किंवा पुढच्या पिढीचे ड्रोन डिझाइन करण्याचे स्वप्न पाहत असाल, तर तुमच्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. तुम्हाला एकही रुपया खर्च न करता हे विषय शिकण्याची संधी मिळत आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) आता एरोस्पेस इंजिनिअरिंगमध्ये १० कोर्सेस उपलब्ध करून देत आहेत. आयआयटीचे हे सर्व अभ्यासक्रम एनपीटीईएल प्लॅटफॉर्मवर ऑनलाइन उपलब्ध आहेत. विद्यार्थी, व्यावसायिक सर्वजण यात प्रवेश घेऊ शकतात. इच्छुक उमेदवार १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करू शकतात.**



- एरोस्पेस अभियांत्रिकीचा परिचय : आयआयटी बॉम्बेने सुरू केलेला हा अभ्यासक्रम एरोस्पेस तंत्रज्ञानाची मूलभूत समज देतो. जुलै २०२५ पासून तो सुरू होईल आणि त्याची परीक्षा ऑक्टोबरमध्ये होईल.
- विमान डिझाइनचा परिचय : आयआयटी मुंबईकडून आणखी एक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे, जो विमानांच्या डिझाइन प्रक्रियेचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण देतो. तो जुलै २०२५ पासून सुरू होईल.
- यांत्रिक कंपनाचे घटक : आयआयटी दिल्लीचा हा अभ्यासक्रम कंपन आणि उड्डाण गतिमानता सखोलपणे समजून घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. हा अभ्यासक्रम जुलैपासून सुरू होईल आणि त्याची परीक्षा २ नोव्हेंबर २०२५ रोजी होईल.विमान कामगिरीचा परिचय : आयआयटी कानपूरने एरोस्पेसशी संबंधित ४ वेगवेगळे अभ्यासक्रम तयार केले आहेत. पहिला अभ्यासक्रम विमान कामगिरीचा परिचय करून देतो. यामध्ये, विमानाच्या उड्डाण कामगिरीचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्पष्टीकरण दिले जाईल. त्याचे वर्ग जुलैपासून सुरू होतील आणि परीक्षा २१ सप्टेंबर रोजी होईल.
- विमान स्थिरता आणि नियंत्रण : आयआयटी कानपूरचा हा दुसरा अभ्यासक्रम आहे. ज्यामध्ये विमान हवेत कसे स्थिर राहते आणि ते कसे नियंत्रित केले जाते हे शिकवले जाईल. हा अभ्यासक्रम जुलैपासून सुरू होईल आणि त्याची परीक्षा १ नोव्हेंबर रोजी होणार आहे.
- डिजाइन फिक्स्ड-विंग अनमॅन्ड एरियल व्हीकल : आयआयटी कानपूरचा हा अभ्यासक्रम ड्रोन तंत्रज्ञानात रस असलेल्यांसाठी खूप खास आहे. यामध्ये ड्रोनची रचना, कामगिरी ऑप्टिमायझेशन, स्थिरता चाचणी आणि प्रोटोटाइप विकास याबद्दल माहिती दिली आहे. त्याची परीक्षा २१ सप्टेंबर रोजी घेतली जाईल.
- एअरब्रेथिंग प्रोपल्शनचा परिचय : प्रोपल्शन तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. त्याचे वर्ग जुलैमध्ये सुरू होतील आणि परीक्षा २६ ऑक्टोबर रोजी घेतली जाईल.
- अप्लाइड कॉम्प्युटेशनल फ्लुइड डायनॅमिक्स : हा अभ्यासक्रम आयआयटी कानपूर देखील देत आहे. या अभ्यासक्रमाचे वर्ग जुलैपासूनच सुरू होतील.
- स्पेस फ्लाइट मेकॅनिक्स : आयआयटी खरगपूरचा हा अभ्यासक्रम रॉकेट उड्डाण आणि कक्षीय गती वैज्ञानिकदृष्ट्या समजून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी आहे. त्याची परीक्षा १ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे.



**या सर्व अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्याची शेवटची तारीख १५ ऑगस्ट २०२५ आहे आणि ते NPTEL द्वारे पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत.**

# आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाला सहा पदके



**मुंबई :** ऑस्ट्रेलियातील ६६ व्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य अशा एकूण ६ पदकांची कमाई केली. विशेष बाब म्हणजे भारताने सर्व देशांमधून सातवा क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. एकूण ११० देशांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत ६३० विद्यार्थी सहभागी झाले होते, यामध्ये ६९ मुलींचा समावेश होता.

यंदा ऑस्ट्रेलियातील सनशाइन कोस्ट येथे १० ते २० जुलै या कालावधीत ६६ व्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडचे (आयएमओ २०२५) आयोजन करण्यात आले होते. सहा विद्यार्थ्यांच्या भारतीय संघामध्ये दिल्लीतील कणव तलवार,आरव गुप्ता आणि महाराष्ट्रातील आदित्य मांगुडी वेंकट गणेश यांनी 'सुवर्ण पदक' पटकावले. कर्नाटकमधील एबेल जॉर्ज मॅथ्यू व दिल्लीतील आदिश जैन यांनी 'रौप्य पदक' आणि दिल्लीतील अर्चित मानस याने 'कांस्य पदक' पटकावले. या भारतीय संघाचे नेतृत्व दिल्लीतील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या प्रा. शांता लैशराम आणि सहनेतृत्व बंगळुरूतील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या डॉ. मैनक घोष यांनी केले. तर अतुल शतावर्त नादिग आणि डॉ. रिजुल सैनी यांनी निरीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली.

दरम्यान, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, ही गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, यासह विविध विषयांच्या ऑलिम्पियाडमध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणारे नोडल केंद्र आहे.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात आरोपींचा जामीन फेटाळला

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या अखिलेंद्र प्रताप सिंग आणि आकाशदीप सिंग या दोन आरोपींचा जामीन अर्ज विशेष मोक्का न्यायालयाने फेटाळला. बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी हत्या झाली होती. त्यांच्यावर तीन हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या प्रकरणात कॉल डेटा रेकॉर्डच्या मदतीने पोलीस आरोपींपर्यंत पोहोचले होते.



आरोपींविरोधात सध्या न्यायालयीन कारवाई सुरू आहे. ही कारवाई सुरू असतानाच अखिलेंद्र प्रताप सिंग आणि आकाशदीप सिंग या दोन आरोपींनी जामिनासाठी अर्ज केला होता. जामीन मागताना, अखिलेंद्रने मकोका लावण्याच्या पोलिसांच्या निर्णयालाच आव्हान दिले. तर आकाशदीपने त्याला आरोपी करण्यासाठी पोलिसांकडे ठोस पुरावेच नसल्याचा दावा केला.

आरोपींच्या जामिनावर सुनावणी झाली त्यावेळी विशेष सरकारी वकील महेश मुळे आणि सिद्दीकीचे वकील प्रदीप घरत आणि त्रिवनकुमार कर्णानी यांनी आक्षेप घेतला. आरोपपत्रात असे काही आहे जे प्रथमदर्शनी आरोप सिद्ध करते. यामुळे जामीन देऊ नये अशी भूमिका विशेष सरकारी वकील महेश मुळे यांनी घेतली. सरकारी पक्ष आणि पीडित कुटुंबाच्या वकिलांनी केलेल्या आक्षेपांवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने दोन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले.

# प्रवेश प्रक्रियेमध्ये दुहेरी लाभ घेणाऱ्या आयटीआय विद्यार्थ्यांवर कडक कारवाई -मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई:** आयटीआय प्रवेश प्रक्रियेमध्ये दुहेरी लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले. विधान परिषदेत २६० च्या प्रस्तावावर उत्तर देताना कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आय टी आय प्रवेश घेताना अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक दोन्ही सवलतींचा गैरफायदा घेतलेल्या विद्यार्थ्यांवर शासनाद्वारे कारवाई करण्यात येणार आहे. खोट्या मार्गाने मिळवलेले फायदे थांबवून प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत स्पष्ट केले होते की, अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा लाभ केवळ हिंदू, बौद्ध आणि शीख समाजातील नागरिकांनाच मर्यादित आहे. इतर धर्मांतील काहींनी जर अशी जात प्रमाणपत्रे वापरून हा लाभ घेतला असेल, तर त्यांच्या प्रमाणपत्रांची वैधता रद्द करण्यात येईल, त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. खढख मध्ये बनावट प्रमाणपत्रांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांविरोधात होणारी कारवाईही महत्त्वाची ठरणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आयटीआय अद्ययावत करण्यासाठी पी पी पी मॉडेल अमलात आणण्याचा क्रांतिकारी निर्णय आमच्या विभागाने घेतला. याद्वारे आयटीआयमध्ये पायाभूत सुधारणा, नवीन सुविधा, तंत्रज्ञान आणि विकासासाठी आवश्यक पाठबळ पुरवले जाईल. इतकेच नाही तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, नवीन अभ्यासक्रम, रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी सहकार्य उपलब्ध होईल. आयटीआयमधील कोर्सेसला डिप्लोमा दर्जाची मान्यता मिळावी यासाठी देखील आम्ही प्रयत्नशील आहोत,असेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन बालकांना अचानक लुळेपणा, अशक्तपणा; घटनेनं जिल्ह्यात खळबळ



**छत्रपती संभाजीनगर –** फुलंब्री तालुक्यातील पाथरी येथील खंबाट वस्तीत एकाच कुटुंबातील तीन मुलांना लुळेपणा आणि अशक्तपणा आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली. अडीच वर्षांचा एक, नऊ वर्षांचा दुसरा आणि अकरा वर्षांचा तिसरा मुलगा, अशा तिघांना छत्रपती संभाजीनगरच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले आहे. या घटनेनंतर आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून गावात सर्वेक्षण आणि उपाययोजना सुरू आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी नागरिकांना घाबरू नये, काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खंबाट वस्तीमध्ये तीन मुलांना अचानक लुळेपणा आणि अशक्तपणाची लक्षणे दिसली. याबाबतची माहिती समोर आल्यानंतर आरोग्य विभाग तातडीने कामाला लागला आहे. दोन दिवसांपूर्वी एका मुलालाही लक्षणे जाणवली. त्याला लगेच रुग्णालयात दाखल केले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. डॉक्टरांच्या अंदाजानुसार त्याला जीबीएस नसावा. त्यानंतर आणखी दोन मुलांना अशीच लक्षणे दिसली. त्यांच्यावरही उपचार सुरू आहेत आणि त्यांची प्रकृती सुधारत आहे. त्यामुळे त्यांनाही जीबीएस नसावा, असा अंदाज आहे.

या घटनेनंतर खंबाट वस्तीत सर्वेक्षण सुरू केले आहे. पाण्याचे स्रोत बंद केले आहेत. जवळपासच्या गावांमध्येही सर्वेक्षण सुरू असून लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरू आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी लोकांना घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी.

आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तीनही बालकांची प्रकृती सुधारत आहे. पहिल्या मुलामध्ये सुधारणा पाहता त्याला जीबीएस नसावा, असा अंदाज आहे. इतर दोन मुलांमध्येही सुधारणा दिसून येत आहे. त्यामुळे त्यांनाही जीबीएस नसेल, असे वाटते. खबरदारी म्हणून आरोग्य विभाग पूर्णपणे लक्ष ठेवून आहे.

# प्रवीण दरेकर लिफ्टमध्ये अडकले, कार्यकर्त्यांनी लिफ्ट तोडून बाहेर काढलं



**मुंबई :** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांच्याबाबत आज भयानक प्रसंग घडला. प्रवीण दरेकर हे आमदार आहेत. ते विविध शासकीय आणि पक्षाच्या कामांसाठी विविध शहरांचा दौरा करतात. राज्यातील ते बडे नेते आहेत. त्यांच्या भूमिकेला राज्याच्या राजकारणात महत्त्वाचं स्थान आहे. पण अशा बड्या नेत्यावर आज मोठा धक्कादायक प्रसंग ओढावला होता. पण कार्यकर्त्यांनी प्रसंगावधान दाखवल्यामुळे ते संकट दूर सारलं गेलं. प्रवीण दरेकर एका लिफ्टमध्ये अडकले होते. पण त्यांची सुखरुप लिफ्टमधून सुटका झाली असून ते ठीक असल्याची माहिती मिळत आहे.

प्रवीण दरेकर वसईतील एका सभागृहाच्या लिफ्टमध्ये अडकले होते. कार्यकर्त्यांनी लिफ्ट तोडून प्रवीण दरेकर यांना बाहेर काढलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण दरेकर ५ ते ७ मिनिटं लिफ्टमध्ये अडकले होते. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे. कार्यकर्त्यांनी लिफ्ट तोडून प्रवीण दरेकर यांना विचावलं आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकास मार्गदर्शन शिबिरासाठी आज वसई त आले होते. वसई पश्चिमेतील एका सभागृहात हा कार्यक्रम होता. प्रवीण दरेकर हॉलच्या इमारतीत आले तेव्हा ते लिफ्टने तिसऱ्या मजल्यावर जात होते. त्या लिफ्टची क्षमता ही १० जणांची होती. पण संबंधित लिफ्टमध्ये तब्बल १५ जण होती. त्यामुळे ती लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर जाण्याऐवजी तळमजल्यावर आली. लिफ्ट तळमजल्यावर आल्यानंतर अडकून पडली होती.

लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर न जाता तळमजल्यावर आली आणि बंद पडून राहिली. यामुळे अचानक खळबळ उडाली. सगळेजण अस्वस्थ झाले. यावेळी कार्यकर्ते आणि प्रवीण दरेकर यांच्या सुरक्षा रक्षकांनी लिफ्ट तोडून त्यांना बाहेर काढलं. प्रवीण दरेकर यांना बाहेर काढल्यानंतर ते प्रचंड घामाघूम झालेले बघायला मिळाले. त्यांनी बाहेर येताच पाणी पिलं. यानंतर ते तीन मजली चालत कार्यक्रमस्थळी गेले. सगळ्यांनी प्रसंगावधान साधल्यामुळे आज मोठी दुर्घटना टळली आहे. दरम्यान, प्रवीण दरेकर यांनी या घटनेवर अद्याप तरी प्रतिक्रिया दिलेली नाही.

# 'ईडी'चे गुगलला समन्स




**नवी दिल्ली :** आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्डरिंग प्रकरणांमध्ये ईडीने गुगल आणि मेटा या जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांना समन्स पाठवत २१ जुलै रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या कंपन्यांवर बेकायदेशीर बेटिंग ॲप्सचा प्रचार केल्याचा आरोप आहे. काही आठवड्यांपासून ईडी विविध ऑनलाइन बेटिंग ॲप्सच्या जाळ्याचा तपास करत आहे. या ॲप्सना कौशल्याधारित गेम्स असल्याचा बनाव करून प्रत्यक्षात जुगारासाठी वापरले जात होते. या प्लॅटफॉर्म्सवरून हजारो कोटींचा काळा पैसा निर्माण झाल्याचा संशय असून, तो हवाला मार्गाने परदेशात पाठवण्यात आल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गुगल व मेटा यांनी या बेटिंग ॲप्सना जाहिरातीसाठी प्राधान्य स्थान उपलब्ध करून दिले.

# मुकेश अंबानी आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती

**मुंबई (प्रतिनिधी) –**रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी हे आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन मुकेश अंबानी यांच्या कंपन्या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. मुकेश अंबानी यांच्या नेतृत्त्वात रिलायन्स तेल आणि पेट्रोकेमिकल कंपनीच्या ओळखीपासून टेलिकॉम, डिजिटल आणि ग्राहक सेवा कंपनीत देखील पाऊल टाकत महत्त्वाचं स्थान मिळवलं.



मुकेश अंबानी अनेक कंपन्यांचे मालक आहेत ज्याचं बाजारमूल्य कोट्यवधी रुपये आहे. मुकेश अंबानी यांच्या मालकीच्या किती कंपन्या आहेत हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, जिओ फायनान्शिअल सर्व्हिसेस, नेटवर्क१८, तळरलो १८, जिओ हॉटस्टार, जिओ सावन नेटवर्क, डेन नेटवर्क्स, हॅथवे केबल आणि डेटाकॉम, इंडिपेंडेंस या कंपन्यांची मालकी मुकेश अंबनी यांच्याकडे आहे.

याशिवाय जस्ट डायल, आलोक इंडस्ट्रीज, स्टर्लिंग एंड विल्सन रिन्यूऐबल एनर्जी, अर्बन लॅडर, हॅथवे, नेटमेड्स, रिलायंस इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चरचा व्यवसाय देखील ते सांभाळतात.

रिलायन्स रिटेल, कॅम्पा कोला, जिओ मार्ट, अजिओ, रिलायंस ट्रेंड्स, स्मार्ट बाजार, टीरा ब्यूटी, रिलायंस फ्रेश यासारख्या कंपन्यांचा देखील त्यात समावेश आहे.

रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, इन्फोमीडिया प्रेस, रिलायन्स न्यू एनर्जी लिमिटेड, रिलायन्स लाइफ सायन्सेस, रिलायन्स स्ट्रॅटेजिक इन्वेस्टमेंट्स सारख्या कंपन्या मुकेश अंबानी यांच्या नावावर आहेत.

फोर्ब्सच्या २० जुलैच्या रिअल टाइम डेटानुसार मुकेश अंबानी यांची नेटवर्थ १११.५ बिलियन डॉलर आहे. फोर्ब्सच्या अब्जाधीशांच्या यादीत मुकेश अंबानी १८ व्या क्रमांकावर आहेत. मिडिया रिपोर्टनुसार मुकेश अंबानी एका दिवशी १६३ कोटी रुपयांची कमाई करतात. एका अंदाजानुसार ते १.५ कोटी रुपये एका मिनिटाला कमावतात. ते अडीच लाख रुपयांची कमाई करतात. मुकेश अंबानी यांची जीवनशैली अलिशान आहे. मुंबईतील त्यांच्या अँटीलियाची किंमत १५००० कोटी रुपये आहे.

## Change In Name

My Old Name is VISHRANTI PRAKASHRAO KAMBLE which now I am changing as New Name VISHRANTI RAVINDRA SIRSE Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Address: Plot No. 66, NAVJIVAN NAGAR GUT NO 145, TARODA(KH) NANDED-431605 Maharashtra MO.7875350377

## Change In Name

My Old Name is SHIRSE RAVINDRA GANGADHAR which now I am changing as New Name SIRSE RAVINDRA GANGADHAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Address: Plot No. 66, NAVJIVAN NAGAR GUT NO 145, TARODA(KH) NANDED-431605 Maharashtra MO.9765770055

## Change In Name

My Old Name is SHAKE SHAKESHABBIR SHAKE HABIB which now I am changing as New Name SHAIKH SHABBIR PATEL S/o SHAIKH HABIB PATEL Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Address: H.N.9-5-1, KHUSRU NAGAR, NEAR KHALED KIRANA, GADEGAON Road NANDED-431604 Maharashtra Mo. No.9960169862

# प्रेमसंबंधातून केलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू; मृतदेह घेऊन नातेवाईक पोहोचले पोलीस ठाण्यात




**बीड:** बीडच्या गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथे प्रेम संबंधातून मारहाणीत मृत्यू झालेल्या तरुणाचा मृतदेह तब्बल पाऊण तास नातेवाईकांनी तलवाडा पोलीस ठाण्याबाहेर ठेवण्यात आला. यातील आरोपींना अटक करा अशी मागणी यावेळी करण्यात आली. या प्रकरणात मुलीच्या वडिलांना भावाला आणि चुलत्याला अटक करण्यात आली आहे. मात्र, इतर दोन आरोपी अद्याप फरार आहेत. (इशशव उीळाश)

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील गंगावाडी गावात प्रेमसंबंधामुळे झालेल्या मारहाणीत २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारानंतर संतप्त नातेवाईकांनी तरुणाचा मृतदेह पोलीस ठाण्याबाहेर ठेवत जोरदार आंदोलन केलं. तब्बल पाऊण तास मृतदेह तलवाडा पोलीस ठाण्याबाहेर ठेवण्यात आला होता. यावेळी नातेवाईकांनी आरोपींना अटक करा, न्याय द्या अशी मागणी यावेळी करण्यात आली. या प्रकरणात मुलीच्या वडिलांना भावाला आणि चुलत्याला अटक करण्यात आली आहे. मात्र इतर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

मृत तरुणाचे नाव शिवम काशिनाथ चिकणे (वय २१) असून त्याचे गावातीलच एका मुलीसोबत प्रेमसंबंध होते. याच कारणावरून मुलीच्या कुटुंबीयांनी शिवमला जबर मारहाण केली. गंभीर अवस्थेत त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आलं, मात्र काही तासांतच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी मुलीचे वडील, भाऊ आणि चुलत्याला अटक केली आहे. मात्र इतर दोन आरोपी अद्याप फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. आरोपींना लवकर अटक करावी, अशी मागणी नातेवाईक आणि ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात होती. या आरोपींना लवकरच अटक करू असे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी तरुणाचा अंत्यविधी केला आहे. शिवम काशिनाथ चिकणे या २१ वर्षीय तरुणाचे गावातीलच एका मुली सोबत प्रेम संबंध होते यातून मुलीच्या कुटुंबीयांनी मारहाण केली आणि उपचारादरम्यान शिवम चा दुर्दैवी मृत्यू झाला. अखेर २४ तासानंतर शिवम वर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या घटनेमुळे गंगावाडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे, प्रेम संबंधामुळे एका तरुणाचा जीव जाणं हे अत्यंत दुर्दैवी असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

# इंजिनिअरिंगचा 'टॉपर' निघाला चोर; पुण्यात दागिने चोरून कर्नाटकला पळालेला अखेर अडकला जाळ्यात



**पुणे :** बुधवार पेठेतील सराफी पेढीतून पावणेपाच लाख रुपयांची फॉर्मिंग ज्वेलरी चोरून कर्नाटकमध्ये पळून गेलेल्या तरुणाला विश्रामबाग पोलिसांनी चार दिवसांच्या तपासानंतर अटक केली. हा तरुण कोणताही सराईत गुन्हेगार नसून, अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना 'टॉपर' राहिलेला विद्यार्थी आहे.

चोरी करणारा तरुण (वय १९) मूळचा कर्नाटकातील कोलार येथील अरनहल्ली गावातील आहे. त्याने सहा जुलैला मध्यरात्री एकच्या सुमारास, दुकानाच्या वॉशरूमच्या खिडकीतून प्रवेश करून फॉर्मिंग ज्वेलरी लंपास केली. दुसऱ्या दिवशी दुकानमालकाने विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.


विश्रामबाग पोलिस ठाण्याचे निरीक्षक संतोष पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राजेश उसगावकर यांच्या तपास पथकाने २३० ते २५० 'सीसीटीव्ही' फुटेज तपासून आरोपीचा मागोवा घेऊन आरोपीला अटक केली. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याला न्यायालयात हजर केले असता १९ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

संबंधित तरुणाने बारावी विज्ञान शाखेत उत्कृष्ट गुण मिळवून सरकारी कोट्यातून कर्नाटकातील इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. मात्र, घरच्यांची आर्थिक परिस्थिती ढासळल्याने त्याने शिक्षण अर्धवट सोडून चोरीचा मार्ग स्वीकारला.

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# मातुळ येथील शेतकऱ्याच्या आखाड्यावर चोरी; उभ्या पिकावर ट्रॅक्टर चालविले

## लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षासह चौघांविरुद्ध भोकर पोलिसांत चोरीचा गुन्हा दाखल







**भोकर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मातुळ येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील उभ्या पिकावर ट्रॅक्टर चालवून पत्राच्या शेडची मोडतोड केली. त्यामधील ठेवलेल्या खतांच्या पोत्यांची व औषधांची चोरी केल्याच्या आरोपावरून लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षासह चौघां-विरुद्ध भोकर पोलिसांत चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर तालुक्यातील मातुळ येथील गट क्रमांक २४४ शेतजमिनीचे मालक शेतकरी आनंदा म्हैसाजी फुले (६०) हे वयोवृद्ध शेतकरी आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह फक्त शेतातील उत्पन्नाच्या माध्यमातूनच शेतात काबाडकष्ट करून चार पैसे गोळा करून कसेबसे आपला जीवन जगत होते. पावसामुळे आपल्या शेतातील अन्नधान्य, बी बियाणे, खत, औषधे व शेती उपयोगी साहित्य सुरक्षित रहावे यासाठी शेतात पत्राच्या शेडची उभारणी केली. दि. १८ जुलै रोजी रात्री मातुळ व इतर गावातील रामा विठ्ठल फुले, शिवराम गंगाधर करेवाड, वर्षा रामा फुले, संगीता मोहन पवळे या लोकांनी माझ्या शेतात येऊन पत्री शेड पाडून त्यामधील खताच्या पोत्यावर सबलीने मारून पोते फाडून, औषधाच्या डब्याची तोडफोड केली. तसेच शेतातील उभ्या ज्वारीच्या पिकावर ट्रॅक्टर चालविले. डोलू लागलेले कापसाचे पीक भुईसपाट केले व शेडमधील खताचे पोते गाडीमध्ये नेल्याची माहिती शेत शेजारी असलेल्या शेतकऱ्यांनी मला दिली. शेतकरी आनंदा म्हैसाजी फुले यांनी शेतात जाऊन पाहणी केली असता शेतातील पत्राच्या शेडची मोडतोड करून त्यातील युरिया खताचे सहा पोते, डीएपी खताचे सहा पोते व फवारणीसाठी ठेवलेले औषधीचे तीन डब्बे फोडून एकूण ४० हजार रुपयांचे नुकसान करून साहित्य एम.एच. २ सीआर ६९९८ चारचाकी व्हॅगनर गाडीमध्ये चोरून नेले असल्याची तक्रार शेत जमीन गट क्रमांक २४४ मधील २ हेक्टर ३ आर चे मालक आनंदा म्हैसाजी फुले यांनी भोकर पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीवरून रामा विठ्ठल फुले, शिवराम गंगाधर करेवाड, वर्षा रामा फुले सर्व रा. मातुळ व लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षा संगीता मोहन पवळे रा. बोरगाव किवळा ता. लोहा यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२),३(५) प्रमाणे १९ जुलै रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड-कॉन्स्टेबल अतिश राचलवाड हे करीत आहेत.

# जिल्ह्यात केंद्र सरकारची आर्थिक समावेशन मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा प्रशासनाने आणि जिल्हा अग्रणी बँकेच्यावतीने केंद्र सरकारची आर्थिक समावेशन मोहीम जिल्ह्यात ०१ जुलैपासून ते ३० सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येत आहे. या मोहिमेत शून्य रक्कमेवर जनधन खाते उघडण्यासह केंद्र सरकारच्या बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विमा व पेन्शन आधी सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक बी. जी. सोनकांबळे यांनी दिली.

ही मोहीम केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशनानुसार आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

मोहिमेत शून्य बॅलन्स जनधन खाते उघडणे, प्रधानमंत्री सुरक्षा विमा व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत नोंदणी करणे, अटल पेन्शन योजनेचे सदस्यत्त्व देणे तसेच दहा किंवा त्याहून अधिक वर्षापूर्वी उघडलेल्या बचत व जनधन खात्यासाठी तसेच निष्क्रिय खात्यासाठी रि-केवायसी करणे आधी महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

या मोहिमेत डिजिटल फसवणुकीपासून स्वतःचे रक्षण कसे करावे व भारतीय रिझर्व बँकेच्या दावा न केलेल्या ठेवीमध्ये हस्तांतरित केलेल्या पैशाचा दावा कसा करावा, याची सर्व माहिती दिली जात आहे.

# भावसार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे १५ रोजी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा भावसार समाजातील २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थी व याच वर्षात सुकन्यारत्न प्राप्त झालेल्या दाम्पत्यांचा गौरव करण्याच्या निमित्ताने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे .

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता कलश बँक्वेट हॉल, जुना कौठा, नांदेड येथे नाविन्यपूर्ण पद्धती व आकर्षक पारितोषिकांचा वर्षावरूपी कार्यक्रम संपन्न होईल.

इयत्ता पाचवी व आठवी वर्गातील स्कॉलरशिप तथा दहावी व बारावी या सर्व परीक्षेतील प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या तसेच सीईटी, नीट, जेईई, समतुल्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व व्यवसाय प्रशिक्षण, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी यांचा शिक्षणप्रेमी दात्यांकडून मिळणाऱ्या पारितोषिकांचे वितरण तसेच यासोबत दि. १६ ऑगस्ट २०२४ ते ५ ऑगस्ट २०२५ या काळात सुकन्यारत्न प्राप्त झालेल्या पालकांचाही गौरव करण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी आपले मार्क मेमो व आधार कार्ड समाजातर्फे देण्यात आलेल्या गुगल लिंकवर अपलोड करावे अथवा झेरॉक्स प्रति आपल्या संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक व स्वाक्षरीसह रमेश बडवणे चौफाळा नांदेड, सौ. अर्चना वळसे विठ्ठल मंदिर रंगार गल्ली, नांदेड, रमेश सूत्रावे, बळीराम गोविंद सूत्रावे कापड दुकान एम. जी. रोड नांदेड, सागर बुलबुले सागर पेपर मार्ट वजीराबाद चौरस्ता नांदेड, संजय बुलबुले, सुषेण मेडिकल हॉल, राज कॉर्नर समोर नांदेड, श्रीनिवास बुलबुले श्री कॉम्प्युटर्स कैलासनगर नांदेड येथे दि. ५ ऑगस्ट २०२५ पर्यंत पोहोचते करावेत. जास्तीत जास्त गुणवंत विद्यार्थी व सुकन्यारत्न पालकांनी सत्कार समारंभाचा लाभ घेण्याचे आवाहन नांदेड जिल्हा भावसार समाजाचे अध्यक्ष गोविंद माळवतकर, सचिव डॉ. विजय काटकाडे, प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. वीणाताई माळवतकर, युवा मंडळाचे अध्यक्ष सागर बुलबुले, भावसार सेवा संघाचे अध्यक्ष गिरीष केदार यांनी केले असल्याचे नांदेड जिल्हा भावसार समाजाचे प्रसिद्धी प्रमुख अनिरुद्ध दांडगे यांनी एका कळविले आहे.

# शीख वेलफेअर असोसिएशनच्यावतीने शीख समाजातील गुणवंत विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**नांदेड़ (प्रतिनिधी)–** शीख समाजातील ज्येष्ठ नागरिकांची सेवाभावी संस्था शीख वेलफेअर असोसिएशनच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन २७ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता श्री गुरू अंगददेवजी यात्री निवास येथे करण्यात येत आहे. या कार्य-क्रमात गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहेब गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघ आणि गुरुद्वारा श्री लंगर साहेबचे मुखी संतबाबा बलविंदरसिंघ कारसेवावाले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमात शीख समाजातील ८० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिक व दरवर्षीप्रमाणे दहावी व बारावी परीक्षेत ६०% पेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष लड्डूसिंघ महाजन यांनी दिली आहे. तेव्हा सत्कारासाठी आपली नावे व गुणपत्रिकेची प्रत संस्थेचे सचिव नारायण नंबरदारसिंघ (९८६००११६९२), रविंदरसिंघ मोदी (९४२०६५४५७४) व श्री हजुरसाहेब आयटीआय येथील निदेशक जगजीतपालसिंघ लोणीवाले (८७६६८०८५७३) यांच्याकडे २४ जुलैपर्यंत नोंद करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्राचीन श्री बालाजी मंदिर सिद्धनाथ पुरी येथे सभागृह उभारणीचे आ. बोंढारकर यांच्या हस्ते भूमिपूजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील सिद्धनाथपुरी चौफाळा येथील प्राचीन श्री बालाजी मंदिराच्या सभागृह उभारणीच्या कामासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांनी स्थानिक आमदार निधीतून दहा लाख रुपये मंजूर केले आहेत. त्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

जुना नांदेड भागातील सिद्धनाथपुरी चौफाळा येथे सातशे वर्षे जुने श्री बालाजी मंदिर आहे. या श्री बालाजी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी आणि मंदिरात येणाऱ्या भाविकभक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या



अनुषंगाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी स्थानिक आमदार निधीतून मंदिराच्या सभागृहासाठी तब्बल दहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मंदिर उभारणीच्या कामाला सुरुवात होत असून, आ. बोंढारकर यांच्या हस्ते सभागृह बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी भाजपा कार्यकारिणी सदस्य चैतन्यबापू देशमुख, बाळू खोमणे, शहरप्रमुख तुलजेश यादव, पै. रवीकिरण डोईफोडे, बाळू पाटील मोरे, बंडोपंत कुंटूरकर, कृष्णा उमरीकर, सरदेशपांडे, बिंदू, मारुती बांद्रे, चिंटू हरकरे, पुरवाजी कोमटवार, विक्रम पाटील बामणीकर, डॉ. पांडे, बालाजी गिरगावकर यांच्यासह स्थानिक नागरिक व मंदिराचे सर्व सभासद उपस्थित होते.

# भाजयुमोच्या शहराध्यक्षपदी तुकाराम माटे यांची निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** भाजयुमोच्या अर्धापूर शहराध्यक्ष-पदी तुकाराम माटे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, आमदार श्रीजयाताई चव्हाण, भाजप नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.



भाजप शहर सरचिटणिसपदी नवनाथ बारसे तर भाजप युवा मोर्चाच्या अर्धापूर शहराध्यक्षपदी तुकाराम माटे यांची निवड झाल्याबद्दल नगरपंचायत गटनेते बाबुराव लंगडे, नगरसेवक प्रतिनिधी डॉ. विशाल लंगडे, भाजपा युवानेते अभिषेक गुरखेल, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, माजी नगरसेवक तुकाराम साखरे, युवा मोर्चाचे चेतन साखरे, शंकर डोलारकर, गणपत बारसे यांच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी नवनिर्वाचित सरचिटणीस नवनाथ बारसे म्हणाले की, वरिष्ठ नेते मंडळींच्या मार्गदर्शनाखाली पक्ष वाढविण्यासाठी कार्य करू.




**नांदेड :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ नांदेड जिल्हा कार्यकारिणीची बैठक प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे नुकतीच पार पडली. यावेळी प्रदेश सचिव संजय सोनटक्के, तेलंगणा प्रभारी माधव निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नांदेड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात येऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. त्याप्रसंगीचे छायाचित्र.
(छाया : करणसिंह बैस)

# अर्धापूर-नांदेड रोडवर दुचाकीची समोरासमोर धडक; दोघे गंभीर जखमी

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** दोन दुचाकीची समोरासमोर जोराची धडक झाल्याची घटना रविवारी दाभड ता. अर्धापूर येथील सत्यगणपती मंदिरासमोर राष्ट्रीय महामार्ग सर्व्हिस रोडवर घडली. यामध्ये दिग्रस येथील तरुण गंभीर जखमी झाला तर इतर गाडीवरील एकजण गंभीर तर एकजण किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.




येळेगाव (तुकाराम महाराज) ता. कळम-नुरी जि. हिंगोली येथील केशव साहेबराव मेटकर वय २७ वर्षे व पूजा केशव मेटकर वय २१ वर्षे दोघे मोटारसायकल (एम.एच.३८ ए.सि.८७५१) ने दाभड येथील श्री सत्य गणपती मंदिरातून दर्शन घेऊन रस्त्यावर येत होते. तर यशवंत बळीराम तिडके वय ३७ रा. दिग्रस ता.अर्धापूर दुचाकीवरुन (एम. एच.२६ बी.व्ही.७१४६) अर्धापूर मार्गे जात होते. दरम्यान, रविवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोराची धडक झाली. यामध्ये यशवंत तिडके हे गंभीर जखमी झाले. तर दुसऱ्या गाडीवरील केशव मेटकर हे गंभीर जखमी झाले.

या अपघाताची माहिती मिळताच दाभड, भोकर फाटा येथील जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थान नाणिज धाम रुग्णवाहीका चालक राजू पाचंगे हे रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी पोहोचले व जखमींना नांदेड येथील शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे तात्काळ दाखल केले.

# सटवाजी आरलवाड यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मौजे हाळदा येथील प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक सटवाजी पोशटी आरलवाड (वय वर्षे ७१) यांचे रविवार, दि. २० जुलै रोजी सकाळी ७ च्या दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुले, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. ते हाळदा येथील ग्रामपंचायतीचे माजी सदस्य होत.



पान १ वरून...

### टीम इंडियाला धक्का...

सरावात व्यस्त होता. मात्र रविवारी, २० जुलै रोजी जिममध्ये ट्रेनिंग दरम्यान रेड्डीच्या गुडघ्याला दुखापत झाली. तत्काळ स्कॅन केल्यानंतर लिगामेंट इन्ज्युरी असल्याचं समोर आलं. त्यामुळे रेड्डी या मालिकेतून बाहेर गेला आहे.

रेड्डीची ही दुखापत किती गंभीर आहे आणि तो किती काळासाठी मैदानाबाहेर राहील, याचा खुलासा आगामी काही दिवसांत होईल. सध्या तरी बीसीसीआयकडून याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्याच्या जागी कोणाला रिप्लेसमेंट म्हणून पाठवले जाईल का, हेही अजून स्पष्ट झालेलं नाही.

गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर दमदार कसोटी पदार्पण करणाऱ्या नीतीशसाठी ही मालिका विशेष काही खास राहिली नाही. पहिल्या सामन्यात त्याला संधी मिळाली नव्हती. मात्र दुसऱ्या कसोटीत शार्दूल ठाकूरच्या जागी त्याची निवड झाली होती. त्या सामन्यात त्याला दोन्ही डावांत मिळून केवळ १-१ धाव करता आल्या आणि गोलंदाजीमध्येही यश मिळालं नाही. तरीही त्याच्यावर विश्वास ठेवून तिसऱ्या कसोटीत पुन्हा एकदा संधी देण्यात आली, जिथे त्याने ३ विकेट्स घेतल्या आणि ३० व १३ धावांच्या उपयुक्त खेळी खेळल्या. मात्र मोठी खेळी साकारण्यात तो अपयशी ठरला.

# श्रावण पाटील भिलवंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नरसी येथील त्यांच्या नंदनवन निवासस्थानी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

नायगाव तालुक्यातील नरसी येथे शनिवार, दि. १९ जुलै रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतीषबाजी करत श्रावण पाटील भिलवंडे यांचे स्वागत केले. कार्यकर्त्यांनी जल्लोषपूर्ण वाता-वरणात तसेच विविध मान्यवर व कुटुंबियांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी केक कापून वाढदिवस साजरा केला.

यावेळी जिल्हा भाजपाचे नेते बालाजी बच्चेवार, मारोतराव कवळे, प्रवीण साले, कृष्णा देशमुख, उमाकांत देशपांडे, सय्यद रहीम सेठ, गजानन पांचाळ, सय्यद खलील सेठ, शंकर पाटील कल्याण, प्राचार्य मनोहर तोटरे, राजू पाटील शेळगांवकर, आनंदराव बावने, नागोराव भेंडेकर, ग्राम सेवक टी. जी. रातोळीकर, नागेश यरसनवार, गोविंदराव कुंटूरकर, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, सहा.उपनिरीक्षक परगेवार, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, भगवान पाटील चव्हाण, तलाठी श्याम मुंडे, शशिकांत देशपांडे, निळकंठ पाटील मरवाळीकर यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, गावातील नागरिक, पाहुणे, मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुदबेनगरमधील खून प्रकरणातील तीन आरोपी अटकेत; नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** देगलूर नाका परिसरात खुदबईनगर भागात शनिवारी एकाचा किरकोळ कारणावरून खून करण्यात आला होता. नांदेड ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणातील तीन आरोपींना अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल होणारे गंभीर गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत सर्व पोस्टें प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. शेख आमेर शेख अजीम (वय ३२ वर्ष व्यवसाय मिस्त्रीकाम रा. मुकीद शादी खान्याजवळ, खुदबेनगर नांदेड) यांनी १९ जुलै रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे तक्रार दिली की, १९ रोजी ८.२० चे सुमारास त्यांचे वडील शेख अजीम शेख समद (वय ६० वर्षे यांना खुदबेनगर चौक) येथे हातगाडा का लावला असे म्हणून वरील आरोपीतांनी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी चाकूने भोसकून जिवे ठार मारले आहे.

या तक्रारीवरून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून लागलीच वेगवेगळ्या तीन टीम तयार करुन त्यांना सुचना दिल्या तसेच गुन्ह्यातील फरार आरोपीतांचा शोध घेणेकामी तात्काळ रवाना केल्या. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हे शोध पथकाचे तीनही टिमने तपासाची चक्रे फिरवून एका आरोपीस नांदेडमधून ताब्यात घेतले व इतर दोन आरोपी गुन्हा करुन जिंतूर जि. परभणी येथे पळून गेले असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली. त्याआधारे जिंतूर जि. परभणी येथे जावून दोन आरोपीतांना अतिशय शिताफीने ताब्यात घेतले. वरील तीनही आरोपीतांना विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांनी हातगाडा लावण्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून फिर्यादीच्या वडिलांस हत्याराने ठार मारल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्ह्यात मोहम्मद अमीर उर्फ अमीर मोहम्मद गौस (वय २९ हबीब या कॉलनी), आश्रफ उर्फ मोहीनखान आजम उर्फ पाशाखान (वय २८ राहणार इक्बाल नगरजवळ हबिबिया कॉलनी आणि मोहम्मद इम्रान मोहम्मद गौस (वय ३९ हबिबिया कॉलनी या तीन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

या गुन्ह्यामध्ये अटक आरोपीं-शिवाय त्यांचे आणखी इतर कोण साथीदार आहेत याचा तपास सुरु आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सचिन गाढवे, हवालदार भोकरे करीत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com